बुधवार, ९ नोव्हेंबर २०२२

# राम प्रहर

◆ वर्ष १५ ◆ अंक ११२
www.ramprahar.com

◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## अंतरंग

चोरीच्या इराद्याने बंदुकीचा धाक दाखविणाऱ्यांना बेड्या/३

जिल्हा रुग्णालयात अनागोंदी; शिंदे गट आक्रमक/५

जिल्हास्तरीय महिला कबड्डी स्पर्धेत किहीम संघ विजेता/८

## राज्यातील सहा मंत्र्यांना वाय प्लस सुरक्षा



**मुंबई :** राज्य सरकारने सहा मंत्र्यांच्या सुरक्षेत वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. या मंत्र्यांना वाय प्लस विथ एस्कॉर्ट सुरक्षा देण्यात आली आहे. सुरक्षेत वाढ करण्यात आलेल्या मंत्र्यांमध्ये ग्रामविकासमंत्री गिरीश महाजन, आदिवासी विकासमंत्री विजयकुमार गावित, कामगारमंत्री सुरेश खाडे, सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण, सहकारमंत्री अतुल सावे, महिला व बालकल्याणमंत्री मंगलप्रभात लोढा यांचा समावेश आहे. वाय प्लस दर्जाच्या सुरक्षेत एकूण ११ सुरक्षा रक्षक असतात. यामध्ये दोन ते चार कमांडोचा समावेश असतो तसेच या सुरक्षेतील कर्मचाऱ्यांच्या ताफ्याच्या दोन ते तीन वाहने असतात. या सहा मंत्र्यांना वाय प्लस विथ एस्कॉर्ट सुरक्षा पुरविण्याचे आदेश गृह विभागाने दिले आहेत.

# ‘भारत जोडो’साठी भ्रष्टाचाराचा पैसा

## राहुल गांधी यांच्या यात्रेवर भाजपचा गंभीर आरोप

**मुंबई : प्रतिनिधी**

काँग्रेस नेते राहुल गांधी यांची भारत जोडो यात्रा महाराष्ट्रात दाखल झाली आहे. या पार्श्वभूमीवर बोलताना भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी गंभीर आरोप केला आहे. मागील अडीच वर्षांतील सत्ताकाळात केलेल्या भ्रष्टाचाराचा पैसा या यात्रेसाठी वापरण्यात येत असल्याचे बावनकुळे यांनी म्हटले आहे तसेच या यात्रेवर होणाऱ्या खर्चाची चौकशी करावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

खासदार राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखालील भारत जोडो यात्रेने सोमवारी रात्री महाराष्ट्रात प्रवेश केला. त्यानंतर मंगळवारी (दि. ८) सकाळी नांदेडच्या देगलूरमधून त्यांच्या पदयात्रेला सुरुवात झाली. भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावर टीका करताना म्हटले की, या यात्रेत खर्च होणारा पैसा, काँग्रेसचा पैसा कुठून आला व कोणी



खर्च केला याची चौकशी उपमुख्यमंत्री आणि गृह विभाग सांभाळणाऱ्या देवेंद्र फडणवीस यांनी करावी. काँग्रेसच्या अधिकृत खात्यातून किती पैसे यात्रेसाठी वापरण्यात आले आहेत आणि प्रत्यक्षात किती यात्रेसाठी किती खर्च झाला? काँग्रेस नेत्यांनी जो खर्च केला आहे तो कुठून केला आहे हे या चौकशीत तपासले पाहिजे, अशी मागणी बावनकुळे यांनी केली.

प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी पुढे म्हटले की, भारत जोडो यात्रेत लोक स्वतःहून येत नसून त्यांना आणले जात आहे. ही यात्रा नेत्यांनी हायजॅक केली आहे. ज्या जिल्ह्यातून यात्रा जाते, त्या जिल्ह्यातील नेत्यांच्या मुलांना पुढे आणले जाते. ही यात्रा म्हणजे इव्हेंट मॅनेजमेंट आहे.

### पुढच्या काळात काँग्रेसला धक्के बसणार!

काँग्रेस कार्यकर्ते राहुल गांधींच्या यात्रेदरम्यानच भाजपमध्ये प्रवेश करीत असल्याचे या वेळी भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत बावनकुळे यांनी सांगितले. २०२४पर्यंत महाविकास आघाडीचे अनेक नेते भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत. आपण विचार करू शकणार नाही असे नेते भाजपमध्ये येतील. सध्या राहुल गांधी महाराष्ट्रात आहेत म्हणून काँग्रेसचे नेत्यांचे त्यांच्यासमोर बोलणे आणि शक्तिप्रदर्शन करणे सुरू आहे, मात्र पुढच्या काळात काँग्रेसला धक्के बसणार असल्याचे सूचक वक्तव्य बावनकुळे यांनी केले.



**पनवेल :** शीख धर्माचे संस्थापक गुरू नानक यांची ५३३वी जयंती मंगळवारी सर्वत्र साजरी झाली. यानिमित्त भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी खारघर येथील गुरूद्वाराला भेट देऊन दर्शन घेतले. त्यांच्यासमवेत भाजपचे खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, युवा नेते विनोद घरत, माजी नगरसेवक हरेश केणी, प्रवीण पाटील, गुरूनाथ गायकर, माजी नगरसेविका नेत्रा पाटील तसेच किरण पाटील, गीता चौधरी, लखवीरसिंग सैनी, जयदास तेलवणे, विनोद ठाकूर, मुनाफ पटेल, शफी पटेल, रामचंद्र जाधव, शैलेंद्र त्रिपाठी, नवनीत मारू, सदानंद भातोसे, रामकृष्णन, युवा नेते हॅप्पी सिंग आदी उपस्थित होते.



# ठाण्यात राडा! हर हर महादेव चित्रपटावरून राष्ट्रवादी-मनसे आमनेसामने

**ठाणे : प्रतिनिधी**

ऐतिहासिक सिनेमांमध्ये विपर्यास केल्याचे सांगत राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि राज्याचे माजी मंत्री जितेंद्र आव्हाड सोमवारी (दि. ७) रात्री थेट ठाण्यातील विवियाना मॉलमध्ये चित्रपटगृहात पोहचले आणि त्यांच्यासह कार्यकर्त्यांनी हर हर महादेव चित्रपटाचा शो बंद केला, मात्र यावरून राडा झाला. मनसे ठाणे अध्यक्ष अविनाश जाधव त्याच शोमध्ये आले आणि त्यांनी पुन्हा शो सुरू केला.

चित्रपटात चुकीचा इतिहास दाखवला असल्याचे जितेंद्र आव्हाड यांनी म्हटले आहे, तर अविनाश जाधव म्हणाले की, जितेंद्र आव्हाड रोज संस्कृतीबद्दल लिहितात. थिएटरमध्ये



येऊन प्रेक्षकांना मारहाण केली हे कुठल्या संस्कृतीला धरून आहे. विरोध करण्याची प्रक्रिया वेगळी असते. तुम्ही काही दिवसांपूर्वी मंत्री होते. आता तुम्हीच कायदे मोडत आहात.

स्वराज्य संघटनेचे प्रमुख संभाजीराजे छत्रपती यांनी चित्रपटांतून शिवकालीन इतिहासाची मोडतोड केली जात असल्याचा आरोप करून इशाराही दिला होता. त्यानंतर वेडात मराठे वीर दौडले सात चित्रपटालाही विरोध दर्शविण्यात येत आहे.

> **हर हर महादेव चित्रपट मी पाहिलेला नाही. त्यात काय वाद आहे मला माहिती नाही. कुणाला त्याबद्दल आक्षेप असतील तर ते सनदशील मार्गाने मांडावेत, मात्र मल्टीप्लेक्समध्ये शिरून तिथल्या लोकांना मारहाण करणे, त्यांच्याशी दादागिरी करणे हे सहन केले जाणार नाही.**
>
> **-देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री**

### मारहाणप्रकरणी आव्हाडांसह कार्यकर्त्यांवर गुन्हा दाखल

येथील विवियाना मॉलमध्ये ‘हर हर महादेव’ या चित्रपटाचा खेळ बंद पाडण्यासाठी गेल्यावर एका प्रेक्षकाला मारहाण केल्याप्रकरणी राज्याचे माजी गृहनिर्माणमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जितेंद्र आव्हाड यांच्यासह सुमारे १०० कार्यकर्त्यांवर ठाण्यातील वर्तकनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. माजीवडा येथील रहिवासी परीक्षित धुर्वे यांच्या तक्रारीनंतर ही कारवाई करण्यात आली.

## निवडक

### गुजरातमध्ये काँग्रेसला धक्का; बड्या नेत्याचा राजीनामा


**अहमदाबाद :** गुजरात विधानसभा निवडणुकीचे बिगूल वाजले असतानाच काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. गुजरात काँग्रेसमधील ज्येष्ठ नेते आणि १० वेळा आमदार राहिलेल्या मोहनसिंह राठवा यांनी पक्षाचा राजीनामा दिला आहे. राठवा हे गेल्या काही दिवसांपासून पक्षामध्ये नाराज असल्याच्या चर्चा होत्या. दरम्यान, ते लवकरच भाजपमध्ये दाखल होणार असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### दिल्लीत वायू प्रदुषणासह पसरली दाट धुक्याची चादर

**नवी दिल्ली :** वाढत्या वायू प्रदूषणामुळे दिल्ली एनसीआरमधील लोक हैराण झाले आहेत. दिल्ली, नोएडा, गाझियाबादसह एनसीआरमध्ये हवा तर विषारी झालीच आहे. शिवाय दाट धुक्यामुळे दृश्यमानताही कमी झाल्याने स्पष्ट दिसत नाही.

### मद्यपी डम्परचालकाने केला घात!

# कशेडी घाटात रिक्षाचालकासह तीन विद्यार्थिनींचा अपघाती मृत्यू



**पोलादपूर : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर कशेडी घाटातील चोळई येथील उतारावर एक डम्पर उलटला. या डम्परमधील राखेचा ढिगारा जवळून जाणाऱ्या रिक्षेवर कोसळून चालकासह डीएडच्या तीन विद्यार्थिनींचा जागीच मृत्यू झाला. हा अपघात सोमवारी (दि. ७) रात्री सव्वासातच्या सुमारास घडला. या प्रकरणी दारू पिऊन वाहन चालवून अपघात करणाऱ्या डम्परचालकाविरुद्ध पोलादपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

खेडकडून भोरकडे राख घेऊन जाणारा आयवा डम्पर (एमएच १२-एमव्ही ३७३८) चोळई गावाच्या हद्दीत तीव्र वळण उतारावर चालक मधुकर तुळशीराम वाघमारे (वय ५०, रा. वडगाव हाळ, ता. भोर, जि. पुणे) याने ब्रेक दाबल्याने उलटला. त्याचवेळी तेथून एक रिक्षा (एमएच ०६-बीव्ही २३१३) जात होती. डम्पर उलटल्याने त्यातील राखेचा ढिगारा रिक्षावर आला. अपघातानंतर डम्परचालकाने घटनास्थळावरून पोबारा करण्यासाठी काही वाहनांकडे लिफ्टही मागितली, पण **(पान २ वर..)**

## ९६व्या मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी नरेंद्र चपळगावकर



**वर्धा : प्रतिनिधी**

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाची बैठक मंगळवारी (दि. ८) वर्धा येथे झाली. या बैठकीत ९६व्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश व वैचारिक लेखनासाठी प्रसिद्ध असलेले नरेंद्र चपळगावकर यांची एकमताने निवड करण्यात आली.

विदर्भ साहित्य संघाचे यंदा शताब्दी वर्ष असल्याने ९६वे संमेलन विदर्भात व्हावे अशी इच्छा महामंडळाची घटक संस्था असलेल्या विदर्भ साहित्य संघाने व्यक्त केली होती. या संमेलनासाठी त्यांनी वर्धा हे नाव संमेलनस्थळासाठी सुचविले होते. साहित्य महामंडळाने त्यांच्या या मागणीला प्रतिसाद देत हे संमेलन वर्ध्याला दिले. चपळगावकर यांच्याशिवाय दुसरे नाव चर्चेला न आल्याने अखेर अध्यक्षपदासाठी त्यांच्याच नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले.

# पनवेलमध्ये शुक्रवारी बालनाट्य प्रशिक्षण कार्यशाळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली लवकरच बालनाट्य स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने तसेच इतर स्पर्धांच्या तयारीच्या दृष्टिकोनातून कलाकारांना मार्गदर्शन करणारी प्रशिक्षण कार्यशाळा येत्या शुक्रवारी (दि. ११) पनवेलमध्ये होणार आहे.


यापूर्वी झालेल्या सहविचार सभेत शिक्षकांनी केलेल्या विनंतीनुसार ११ नोव्हेंबर रोजी दुपारी ३ ते सायंकाळी ५ या वेळेत पनवेल मार्केट यार्डमधील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात नाट्यलेखन प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात येणार आहे. या कार्यशाळेमध्ये बालनाट्य हा काय साहित्यप्रकार आहे, त्याचे लेखन आणि उद्दिष्ट, विषयाची निवड आणि कथेचा विस्तार त्याचबरोबर पात्र निर्मिती आणि प्रसंग विस्तार, संवाद लेखन, नाट्य वाचन आणि फायनल ड्राफ्ट या सर्व गोष्टींबाबत चर्चा होऊन मार्गदर्शन होणार आहे. या वेळी सुप्रसिद्ध बालनाट्य लेखक दिग्दर्शक राजू तुलालवार यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

या कार्यशाळेसाठी १०० रुपये माफक शुल्क असून इच्छुकांनी श्यामनाथ पुंडे (९८२१७५८१४७) किंवा संतोष चव्हाण (९८६९९६७८४७) यांच्याकडे १० नोव्हेंबरपर्यंत नोंदणी करावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# मॉरिशस मराठी मंडळातर्फे पनवेलमध्ये नृत्याविष्कार

## महाराष्ट्रापासून लांब राहूनही संस्कृती समृद्ध करण्याचे काम -परेश ठाकूर





या बातमीचा व्हिडीओ पाहण्यासाठी हा क्यूआर कोड स्कॅन करा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र भूमीपासून लांब राहूनही मॉरिशस मराठी मंडळाने आपली मराठी संस्कृती ही केवळ जपलीच नाही, तर ती समृद्ध करण्याचे काम केले असल्याचे गौरवोद्गार पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी सोमवारी (दि. ७) केले. मॉरिशस मराठी मंडळातर्फे नृत्याविष्कार कार्यक्रमाचे आयोजन पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते.

मॉरिशस येथील मराठी कलावंतांची आनंदवारी घेऊन मॉरिशस दूरदर्शनचे अधिकारी अर्जुन पुतलाजी व त्यांच्या ग्रुपच्या वतीने नृत्याविष्काराचा पहिला कार्यक्रम पनवेल येथील फडके नाट्यगृहात सोमवारी झाला. या कार्यक्रमास माजी नगरसेवक अनिल भगत, अ‍ॅड. मनोज भुजबळ, बबन मुकादम, भाजप शहर उपाध्यक्ष नितीन पाटील, कामोठे शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, अ‍ॅड. मनोज म्हात्रे, प्रा. चंद्रकांत मढवी, संस्थेचे अध्यक्ष मोहन भाईर यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

श्री गणेशाचे वंदन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर पोवाडा, कोळीगीत असे वेगवेगळे नृत्याविष्कार सादर झाले. त्यास रसिकांनी दाद दिली. शेवटी महाराष्ट्र गीतावेळी तर नाट्यगृहातील सारे प्रेक्षक उठून उभे राहिले. संपूर्ण कार्यक्रम अतिशय छान झाला.



# खोक्यांच्या आरोपांवरून शिंदे गट आक्रमक

## आरोप करणाऱ्यांना पाठवणार मानहानीची नोटीस

**पुणे : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भाजपच्या साथीने सरकार स्थापन केले, मात्र त्यानंतर बंडखोरांवर ५० खोके घेतल्याचे आरोप करण्यात आले होते. हे आरोप आता सातत्याने होत असून यावर शिंदेगट आक्रमक झाला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाचे नवनियुक्त प्रवक्ते विजय शिवतारे यांनी याबाबत आरोप करणाऱ्यांना मानहानीची नोटीस पाठवणार असल्याचा इशारा दिला आहे.



शिंदेगटाचे प्रवक्ते विजय शिवतारे यांनी पत्रकार परिषद घेऊन शिंदे गटाची अधिकृत भूमिका जाहीर केली.

खोके घेतल्याच्या टीकेमुळे शिंदेगटाची सातत्याने प्रतिमा मलिन होत आहे. त्यातच कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्यावर वादग्रस्त टीका केली होती. त्यामुळे शिंदे गटावर मोठ्या प्रमाणात टीका झाली. त्यानंतर आता शिंदेगट आक्रमक झाला आहे. प्रवक्ते विजय शिवतारे म्हणाले की, सुप्रिया सुळे म्हणत असतील की, ५० खोके घेऊन सरकार बनवले, तर मग अजित पवार सकाळी शपथविधीला गेले होते तर त्यांना किती खोके मिळाले होते, शरद पवार यांनी १९७८साली काँग्रेसचे ३८ आमदार फोडून पुलोदच सरकार स्थापन केले होते. त्यावेळी ३८ आमदारांना किती खोके दिले होते, असे सवाल शिवतारे यांनी उपस्थित केले.

शिंदेगटाच्या नेत्यांवर होत असलेल्या ५० खोक्यांच्या टिकेवरून बोलताना सुप्रिया सुळेंनी, माझ्याबाबत असा प्रकार घडला असता तर मी गुन्हा दाखल केला असता, न्यायालयात गेले असते, असे म्हटले. त्यानंतर आम्ही सुप्रिया सुळेंचा सल्ला ऐकला आहे. त्यानुसार अजित पवार, सुप्रिया सुळे आणि आदित्य ठाकरे यांनी वारंवार ५० खोके घेतल्याचा आरोप केला आहे. त्यामुळे, शिवसेनेचे ४० आमदार आणि १० अपक्ष आमदार अशा एकूण ५० आमदारांच्या वतीने या तिन्ही नेत्यांविरुद्ध बदनामीचा खटला दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाल्याचेही प्रवक्ते विजय शिवतारे यांनी म्हटले आहे.

या तिन्ही नेत्यांनी एकतर नेत्यांची बदनामी केली म्हणून जाहीरपणे माफी मागावी अन्यथा बदनामीच्या खटल्याला कायदेशीर मार्गाने सामोरे जावे, असा इशाराच शिंदे गटाकडून देण्यात आला आहे. अब्दुल सत्तार यांनी केलेल्या विधानाचे कोणीही समर्थन करणार नाही. त्यांच्याकडून झालेले विधान हे चुकीचे आहे, मात्र हे विधान त्यांच्या तोंडून का बाहेर आले याचाही विचार व्हायला हवा. वारंवार ५० खोके घेतल्याचा आरोप करीत बदनामी करण्याचा प्रयत्न होत आहे. त्यातूनच संयम सुटल्यानेच अब्दुल सत्तार यांचे स्लीप ऑफ टंग झाले, असे विजय शिवतारे यांनी म्हटले. तसेच, अजित पवार, सुप्रिया सुळे आणि आदित्य ठाकरे यांनी अशी बदनामी केल्यामुळे, त्यांनी कोर्टात ५० खोके घेतल्याचे पुरावे सादर करावेत. अन्यथा २५०० कोटींच्या अब्रु नुकसानीच्या दाव्याच्या नोटीसा दिल्या जातील, असे शिवतारे यांनी स्पष्ट केले.

यापुढे शिंदे गटावर खोक्यांचा आरोप करणाऱ्यांना मानहानीची नोटीस पाठवण्यात येणार असल्याचे शिवतारे यांनी स्पष्ट केले. त्यामुळे आता शिंदे गटावर ५० खोक्यांची टीका करणे महागात पडणार आहे.

# भारतातील दहशतवादी कारवायांसाठी दाऊदची रसद



## 'एनआयए'च्या आरोपपत्रात दावा

**मुंबई : प्रतिनिधी**

केंद्रीय तपास संस्था राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) टेरर फंडिंग प्रकरणात मोठा दावा केला आहे. भारतातील दहशतवादी कारवायांसाठी अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमकडून पैसे पाठवण्यात येत होते. त्यासाठी हवाला मार्गाचा वापर दाऊदकडून करण्यात येत असल्याचे एनआयएने म्हटले आहे. मागील चार वर्षांत हवालाद्वारे दहशतवादी कारवायांसाठी सुमारे १२ ते १३ कोटी रुपयांची रसद दाऊदने भारतात पाठवली असल्याचे एनआयएने आरोपपत्रात म्हटले आहे.

दहशतवाद्यांना होणाऱ्या आर्थिक मदतीबाबत केंद्रीय तपास यंत्रणांकडून तपास सुरू आहे. या तपासादरम्यान तपास यंत्रणांनी काहींना अटक केली असून चौकशीदेखील सुरू आहे. त्यातून अनेक माहिती समोर येत आहे. फरार अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिम याने हवाला रॅकेटचा वापर करून दहशतवादी कारवायांसाठी पैसा पुरवला असल्याचे समोर आले आहे. दाऊद इब्राहिमने दहशतवादी कारवायांसाठी मुंबईत २५ लाख रुपये पाठवले होते, असेही एनआयएने म्हटले आहे.

मुंबईत दहशतवादी कारवाया आणि मोठे हल्ले घडवण्यासाठी दाऊद इब्राहिम आणि त्याचा साथीदार छोटा शकीलने दुबईमार्गे पाकिस्तानातून २५ लाख रुपये पाठवले असल्याचे एनआयएने म्हटले. हा पैसा सुरतमधून भारतात आला होता. त्यानंतर तेथून मुंबईला पोहोचला होता. हे पैसे हवालाद्वारे आरिफ शेख आणि शब्बीर शेख यांच्यापर्यंत पोहचवले गेले.

मागील चार वर्षात हवालाद्वारे दहशतवादी निधीसाठी जवळपास १२ ते १३ कोटी रुपये भारतात पाठवण्यात आले असल्याचे एनआयएने म्हटले आहे. पाकिस्तानातून भारतात आणलेले २५ लाख रुपये दहशतवादी कारवाया करण्यासाठी पाठवण्यात आले होते असेही एनआयएने आरोपपत्रात म्हटले. शब्बीरने पाच लाख रुपये ठेवले होते आणि उर्वरित रक्कम एका साक्षीदारासमोर आरिफला दिली होती. शब्बीरच्या घराची ९ मे २०२२ रोजी झडती घेतली असता त्याच्याकडून पाच लाख रुपये जप्त करण्यात आल्याचे एनआयएने म्हटले आहे.

# खारघर ओवे कॅम्पमधील पाणीप्रश्न सोडविण्याची मागणी

**पनवेल : वार्ताहर**

खारघर ओवे कॅम्पमधील पाणी प्रश्न सोडविण्याची मागणी बाळासाहेबांची शिवसेना पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी महापालिका प्रशासनाकडे केली आहे. यासंदर्भात आयुक्त गणेश देशमुख यांची भेट घेत पाणी निवेदन देण्यात आले.



खारघरसारख्या सुसज्ञ ठिकाणी वसलेल्या गावामध्ये एक दिवसआड आणि तेही फक्त एक ते दोन तास प्रत्येक घराला पाणी उपलब्ध होते. ऑगस्ट महिन्यामध्ये, पनवेल महापालिकेने एका पत्राद्वारे, सिडको प्रशासनाने मान्यता दिल्याप्रमाणे, ५० एमएम घेरा असलेल्या पुरवठा पाईपलाईनमध्ये वृद्धी करून १०० एमएम करण्यास मान्यता पत्र दिल्याने, गावामध्ये लवकरच मोठी पाईपलाईन टाकण्याचे लिखित आश्वासन दिले होते, मात्र दोन महिने उलटले तरीही, हे काम प्रलंबित आहे. त्यामुळे महानगर संघटक मंगेश रानवडे यांनी जिल्हा संपर्कप्रमुख रामदास शेवाळे यांच्या निदर्शनास ही बाब आणली. संपर्क प्रमुख रामदास शेवाळे यांच्या अध्यक्षतेखाली, शिष्टमंडळ, व ओवे कॅम्पमधील रहिवाशांनी आयुक्त गणेश देशमुख यांची भेट घेऊन ही समस्या लवकरात लवकर सोडवावी याबाबतचे निवेदन सादर केले.

शिष्टमंडळामध्ये महानगर संघटक मंगेश रानवडे, खारघर शहर संघटक इम्तियाज शेख, मुनाफ अमरेली व झोयेब शेख, तसेच ओवे कॅम्पमधून निवृत्ती सकपाळ व गणेश रेवणे या चर्चा सभेमध्ये उपस्थित होते.

पनवेल महापालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांनी, लवकरात लवकर ओवे कॅम्प येथील रहिवाशांच्या पाणीटंचाईबाबत तोडगा काढण्यासाठी महानगरपालिका कटिबद्ध राहील, असे उपस्थित सर्वांना आश्वासित केले.

# जखमी श्वानाला वाहतूक पोलिसांनी दिले जीवदान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सध्याच्या धावपळीच्या युगात जखमी माणसाला योग्य वेळेत उपचार मिळत नाही, परंतु कळंबोली वाहतूक कर्मचाऱ्यांनी एका जखमी श्वानाला उपचार मिळवून जीवदान दिले आहे.

कळंबोली वाहतूक शाखेच्या परिसरातील एका श्वानाला अज्ञात वाहनाने चिरडले होते. यानंतर वाहतूक वरिष्ठ पोलीस निरीक्षक निशिकांत विश्वकर यांच्या मार्गदर्शनाखाली वमंगेश पाटील व अतुल शिंदे यांनी पालिकेच्या श्वानपथकाला बोलावून तक्का येथील प्राण्यांच्या दवाखान्यात दाखल केले. या जखमी श्वानावर पालिकेचे कर्मचारी संदेश सावंत, साहिल कदम यांनी सहा दिवस प्राथमिक उपचार केले, तर १५ ऑक्टोबर रोजी डॉ. एच. जी. घनवट व डॉ. अमेय तांडेल यांनी शस्त्रक्रिया केली.

# समर्थकांसह मनीष ठाकूर बाळासाहेबांच्या शिवसेनेत दाखल

**पनवेल : वार्ताहर**

उद्योजक मनीष ठाकूर यांच्यासह त्यांच्या शेकडो समर्थकांनी हातात भगवा झेंडा घेत सोमवारी (दि. ७) बाळासाहेबांच्या शिवसेनेमध्ये प्रवेश केला. खासदार श्रीरंग बारणे यांनी त्यांचे स्वागत केले. संपर्कप्रमुख रामदास शेवाळे आणि उपमहा नगरप्रमुख चंद्रकांत राऊत यांच्या पुढाकाराने हा पक्षप्रवेश झाला.



पनवेलमध्ये संपर्कप्रमुख रामदास शेवाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षसंघटना मजबूत करण्यासाठी पावले उचलण्यात येत आहेत. त्या अनुषंगाने उद्योजक मनीष ठाकूर यांच्यासह सोमवारी शेकडो उत्तर भारतीयांनी भगवा हातामध्ये घेतला. खासदार श्रीरंग बारणे यांच्या उपस्थितीत त्यांनी बाळासाहेबांच्या शिवसेनेमध्ये प्रवेश केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व समाजातील घटकांना बाळासाहेबांच्या शिवसेनेमध्ये सामावून घेतले जात आहेत. बाहेरील राज्यातून या भागात नोकरी, व्यवसायानिमित्त स्थायिक झालेलेही आपलेच बांधव आहेत. त्यांचे प्रश्न सोडवण्याच्या दृष्टिकोनातून बाळासाहेबांची शिवसेना कटिबद्ध असल्याचे बारणे यांनी सांगितले. त्याचप्रमाणे पनवेल परिसरामध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा लवकरच मेळावा घेण्यात येणार आहे. या माध्यमातून आपली राजकीय ताकत दाखवून देऊ असेही त्यांनी सांगितले.

उत्तर भारतीय मोठ्या संख्येने पनवेल परिसरात स्थायिक झाले आहेत. त्यांच्या समस्यांची सोडवणूक करण्याच्या अनुषंगाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासारखे नेतृत्व खरोखर आशादायी आहे. या भागामध्ये रामदास शेवाळे यांच्या नेतृत्वाखाली अतिशय चांगले संघटन सुरू आहे. या पाश्वभूमीवर मी बाळासाहेबांच्या शिवसेनेमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला, असे मनीष ठाकूर यांनी सांगितले.

या वेळी पदाधिकाऱ्यांची विविध पदी नियुक्ती करण्यात आली. संपर्कप्रमुख रामदास शेवाळे, महानगर संघटक मंगेश रानवडे, महानगर संघटिका ॲड सुलक्षणा जगदाळे, उप महानगरप्रमुख चंद्रकांत राऊत, अर्जुन डांगे, कळंबोली शहर प्रमुख तुकाराम सरक, रामदास शेवाळे प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्रीकांत फाळके, दत्ता शिंदे, आबा लकडे, महेश गोडसे, शरद कदम यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.



**पनवेल : भवानीमाता सेवा संस्थेवर सरस्वती झा यांची निवड करण्यात आली आहे. त्यांना नियुक्तीपत्र देताना महापालिकेचे माजी नगरसेवक राजू शर्मा, भाजपचे कमल कोठारी आदी उपस्थित होते.**

# विरोधकांनी संजय राऊतांची विधाने आठवावी

## भाजप महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ यांचे टीकास्त्र

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्याचे कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्याविषयी केलेल्या आक्षेपार्ह टिप्पणीवरून राज्यात ठिकठिकाणी आंदोलने केली जात आहेत. अब्दुल सत्तार यांच्या राजीनाम्याची मागणीही करण्यात आली असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना राष्ट्रवादी काँग्रेसकडून अल्टिमेटम देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर भाजप महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ यांनी यासंदर्भात आपली भूमिका स्पष्ट केली, असून संजय राऊतांनी केलेल्या विधानांची आठवण करून दिली आहे.



चित्रा वाघ यांनी त्यासंदर्भातला व्हिडीओही त्यांनी ट्वीट केला आहे. मंत्री अब्दुल सत्तार यांच्या वक्तव्याचे समर्थन नाहीच, पण महिलांचा अपमान झाल्यावर निवडक नेत्यांविरोधात संताप कितपत योग्य? कंगना रनौत, स्वप्नाली पाटकर, केतकी चितळेबद्दल आवाज का उठला नाही? महिलांचा अपमान ही महाराष्ट्राची संस्कृती नाही. त्यामुळे अशा वक्तव्याचे समर्थन नाहीच. सगळ्यांनीच भान ठेवा, असे चित्रा वाघ आपल्या ट्वीटमध्ये म्हणाल्या आहेत.

दरम्यान, त्यांनी संजय राऊतांच्या विधानांचाही उल्लेख केला आहे. प्रत्येक महिलेचा आदर-सन्मान व्हायला हवा. महिलांनीही बोलताना तारतम्य बाळगले पाहिजे. पुरुषांनी तर सन्मानच केला पाहिजे, पण मी महिला आहे म्हणून मी वाट्टेल ते बोलेन आणि त्याला जर उत्तर आले तर महिलांची अस्मिता दुखावली गेली असे म्हणत असाल तर ते बरोबर नाही. दोघांनीही एकमेकांचा आदर-सन्मान ठेवायला हवा. उत्तराला प्रत्युत्तर असते, असे चित्रा वाघ म्हणाल्या आहेत.

गेल्या अडीच वर्षांत काही का केले नाही? संजय राऊतांवर का गुन्हे दाखल करण्यात आले नाहीत? एका अभिनेत्रीला हरामखोर म्हणणे हे योग्य आहे का? स्वप्ना पाटकर महाराष्ट्रातील मुलगी नव्हती का? त्यांच्यावर बोलल्यानंतर संजय राऊतांवर का गुन्हे दाखल करण्यात आले नाहीत? असे प्रश्न चित्रा वाघ यांनी उपस्थित केले आहेत.

# मुरुड शाळेची निविदा नव्याने करण्याची ठेकेदाराची मागणी



**मुरुड : प्रतिनिधी**

मुरूड नगर परिषदेकडून काही दिवसांपूर्वी शाळा क्रमांक १ची जीर्ण इमारत पाडण्याबाबतची निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती. निविदेमध्ये अटी व शर्ती न टाकता टेंडर फॉर्ममध्ये आवश्यक कागदपत्रांची यादी नमूद केली होती. अटी व शर्ती या कायद्यान्वये टेंडरमध्ये नमूद असणे आवश्यक आहे. त्यामुळे ही निविदा प्रक्रिया नव्याने करण्यात यावी, अशी मागणी ठेकेदार समीर शब्बीर शेख यांनी केली आहे.

याबाबत त्यांनी सांगितले की, या निविदेमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाचे प्रमाणपत्र मागण्यात आले होते. वास्तविक इमारत तोडण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रमाणपत्राची आवश्यकता नसते.

राज्यात मी अनेक ठिकाणी काम केले आहे, परंतु तिथे असे प्रमाणपत्र मागण्यात आले नाही. मी ११ लाख ११ हजार ७८६ रुपयांचे टेंडर भरले होते, परंतु बांधकाम खात्याच्या प्रमाणपत्राअभावी माझी निविदा उघडण्यात आली नाही. इमारत तोडण्यासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे रजिस्ट्रेशन आवश्यक आहे, हे कोणत्या कायद्याखाली योग्य आहे याचा खुलासा नगर परिषदेच्या मुख्याधिकारी यांनी करावा अशी मागणी समीर शेख यांनी केली आहे.

याप्रकरणी मुरूड नगर परिषदेचे मुख्याधिकारी पंकज भुसे यांच्याशी संपर्क साधला असता, होऊ शकला नाही.

पान १ वरून

# कशेडी घाटात रिक्षाचालकासह तीन विद्यार्थिनींचा अपघाती मृत्यू

अपघाताच्या आवाजाने चोळईतील ग्रामस्थ रस्त्यावर आल्याने त्याला तेथून पळून जाण्यात यश आले नाही. या वेळी त्याने डम्परमधून कोसळलेल्या राखेच्या ढिगाऱ्याखाली एक रिक्षा असल्याचे प्रत्यक्षदर्शींना सांगितले. त्यानंतर तातडीने बचावकार्य सुरू झाले.

या अपघातामध्ये रिक्षचालक अमाज उमर बहूर (वय ४६, रा. गोरेगाव, ता. माणगाव, जि. रायगड) याच्यासह खेड येथे डीएडची परीक्षा देऊन परतणाऱ्या विद्यार्थिनी हानिमा अब्दुल सलाम पोपेरे (वय २३, रा. नांदवी, ता. माणगाव), अलिया सिद्दीक बहूर (वय २०, रा. गोरेगाव, ता. माणगाव) आणि नाजनीन मुकीद करबेलकर (वय २२, रा. वावे, ता. पोलादपूर) यांचा जागीच मृत्यू झाला होता. अपघातग्रस्त रिक्षा आणि मृतदेह महत्प्रयासाने बाहेर काढण्यात आले. सर्व मृतदेह पोलादपूर ग्रामीण रुग्णालयमध्ये नेऊन शवचिकित्सा व विच्छेदन करण्यात आले.

या अपघाताची खबर चोळईतील शंकर दिनकर जगताप यांनी दिल्यानुसार पोलादपूर पोलीस ठाण्यात डम्परचाक मधुकर वाघमारे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**सरकारकडून पाच लाखांची मदत**

या अपघाताची खबर कळताच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रत्येक मृताच्या वारसांना राज्य सरकारतर्फे पाच लाख रुपये सानुग्रह मदत जाहीर केल्याची माहिती रायगडचे पालकमंत्री उदय सामंत यांनी ट्विटरवरून दिली, तर महाडचे आमदार भरत गोगावले यांनी माजी जि. प. उपाध्यक्ष चंद्रकांत कळंबे यांच्यासह ग्रामीण रुग्णालयात जाऊन मृतांच्या आप्तपरिवाराची भेट घेत त्यांचे सांत्वन केले.

# नवी मुंबईत बांधकामांसाठी समिती

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईतील खासगी व शासकीय बांधकामे तसेच विकासकामे आदींची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी सरकारने शासकीय व बांधकाम तज्ज्ञांची समिती स्थापन केली आहे. या समितीमध्ये माजी मुख्य सचिव, प्रधान सचिव (नगरविकास), सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक आणि क्रेडाई एमसीएचआयचे प्रतिनिधी यांचा समावेश आहे. विकासादरम्यान उद्भवणाऱ्या कोणत्याही समस्येवर ही समिती उपाय सुचवेल.


सिडकोने नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, मेट्रो, नैना, कॉर्पोरेट पार्क इत्यादींसह विविध प्रकल्प हाती घेतले आहेत. निवासी आणि व्यावसायिक प्रकल्प तयार करण्यासाठी सिडकोने विकसकांना भाडेतत्त्वावर जमीन दिली आहे. त्याच वेळी या भूखंडांवर आणि लगतच्या भागात नागरी सुविधांसह आवश्यक पायाभूत सुविधा विकसित करण्याची जबाबदारीही सिडकोची आहे. यासंदर्भात ही समिती समन्वय साधेल. राजेश प्रजापती आणि आर. केवल वलंभिया या समितीचे सदस्य आहेत.

याबाबत राजेश प्रजापती म्हणाले, की मूलभूत पायाभूत सुविधांना उशीर झाल्यामुळे अनेक प्रकल्पांना विलंब झाला. अतिरिक्त लीज प्रीमियममध्ये मोठी वाढ झाल्याने घर खरेदीदारांवर परिणाम होत आहे. या निर्णयामुळे विविध रखडलेले प्रकल्प पुन्हा सुरू होण्यास मदत होईल व खरेदीदारांना ताबा देण्याचा मार्ग मोकळा होईल.

**समितीमुळे कामकाजात अधिक पारदर्शकता येईल. विविध प्रकल्पांना गती मिळण्यास मदत होईल आणि नवी मुंबई आणि लगतच्या परिसरातील जलद विकासाचा मार्ग मोकळा होईल.**
**– डॉ. संजय मुखर्जी,**
**उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

**विकसकांनी विविध ठिकाणचे त्यांचे प्रकल्प वेळेत पूर्ण केले असूनही रस्ते, पाणी आणि इतर मूलभूत सुविधांना वेळ लागतो. तसेच ओसी मंजुरीला विलंब होतो. या समितीच्या स्थापनेमुळे या समस्या त्वरेने सोडवल्या जातील.**
**– बोमन इराणी,**
**अध्यक्ष, क्रेडाई एमसीएचआय**

## दुखवटा — सदाशिव पाटील



**पनवेल** : सोमटणे येथील सदाशिव महादेव पाटील यांचे शनिवारी (दि. ५) सायंकाळी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. मृत्यूसमयी ते ७३ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात तीन मुले व मोठा परिवार आहे. कै. सदाशिव पाटील यांचा दशक्रिया विधी १४ नोव्हेंबर रोजी उद्धर रामेश्वर (पाली) येथे, तर उत्तरकार्य विधी १७ नोव्हेंबर रोजी सोमाटणे येथे होणार असल्याचे कुटुंबीयांनी सांगितले.

# कामगारांच्या प्रश्नांसाठी सदैव तत्पर

## भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांचे प्रतिपादन

### तळोजा एमआयडीसीत संघटनेच्या नामफलकाचे अनावरण



या बातमीचा व्हिडीओ पाहण्यासाठी हा क्यूआर कोड स्कॅन करा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप पुरस्कृत जय भारतीय जनरल कामगार संघटना भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली कामगारांना न्याय मिळवून त्यांच्या समस्या सोडविण्याचे काम करत आहे. त्या पार्श्वभूमीवर तळोजा औद्योगिक वसाहतीमधील केमस्पेक केमिकल कंपनीमधील कंत्राटी कामगार जय भारतीय जनरल कामगार संघटनेत सामील झाले आहेत. त्यानुसार या कंपनीजवळ जनरल कामगार संघटनेचे नाम फलक उभारण्यात आले आहे. या नामफलकाचे अनावरण भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते मंगळवारी (दि. ८) झाले.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले की, कंपनी जगली तर कामगार जगतील. त्यामुळे कंपनी बरोबर सहकार्याची भावना आमची असणार आहे. पण हे सर्व कामगार स्थानिक रहिवासी आहे. त्यामुळे माझ्या मतदार संघातील कामगार आमच्या संघटनेचे सभासद असो किंवा नसो त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी वेळ प्रसंगी संघर्ष करण्यासही आम्ही तयार असतो याची नोंद कंपनीने घ्यावी प्रतिपादन केले.

या वेळी संघटनेचे संघटक रवींद्र कोरडे, स्थानिक युनियन प्रतिनीधी संतोष घरत, जीवन भोईर, अंकुश भोईर, बळीराम भोईर, महेश पाटील, अशोक साळुंखे, अंकुश पाटील, पवन भोईर, लहु भोईर, अंकुश भोईर, कुणाल पाटील, प्रल्हाद भोईर, अमित पाटील, जिवन भोईर, वैभव भोईर, भाजप युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, सचिन शिंदे, दिलीप भोईर, अनिश कडू, रवींद्र भोईर आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



**पनवेल : ज्येष्ठ पत्रकार माधव बाबू पाटील यांच्या मातोश्री तुळसाबाई बाबू पाटील यांचे नुकतेच निधन झाले आहे. हे वृत्त कळल्याने माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, प्रकाश भगत, अजय भगत यांनी बामणडोंगरी येथे ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील व पाटील कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले. या वेळी ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे, दीनानाथ कडू, सुभाष नाईक, विलास म्हात्रे, दीपक गोंधळी यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.**



**ठाणे : भारतीय जनता पक्ष शिक्षण आघाडी कोकण विभागाच्या वतीने जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत यांना वसंत स्मृती आदर्श शिक्षण संस्थाचालक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या सोहळ्यात हा पुरस्कार राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते अरुणशेठ भगत यांच्या वतीने रायगड जिल्हा शिक्षक सेलचे संयोजक के. सी. पाटील गुरुजी यांनी स्वीकारला. या वेळी कार्यक्रमाचे आयोजक आमदार निरंजन डावखरे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.**

## निवडक

### रेल्वे स्टेशन येथे आढळला मृतदेह

**पनवेल :** रेल्वे स्टेशन फलाट क्रमांक एक येथे एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाइकांचा शोध शहर पोलीस घेत आहेत. मयत व्यक्तीचे अंदाजे वय ४५ ते ५० वर्षे, अंगाने सडपातळ, रंग सावळा, डोक्याचे केस काळे व अर्धवट टक्कल असलेले आहे. दाडी मिशी बारीक वाढलेली असून अंगात चॉकलेटी बर्मुडा व काळा टी शर्ट घातलेला आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा सहाय्यक पोलीस निरीक्षक वृषाली पवार यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### राजेंद्र मांगरूळकर यांची निवड



**उरण :** पनवेल तालुक्यातील भिंगारी कुंभार आळी येथील पनवेल तालुका कुंभार समाजाचे अध्यक्ष राजेंद्र मंगरूळकर यांची कुंभार समाज सामाजिक संस्था महाराष्ट्र प्रदेश, कोकण विभागीय अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आल्याबद्दल जिल्ह्यातील कुंभार समाजातर्फे त्यांचे अभिनंदन होत आहे. दरम्यान, चिरनेर येथील श्री संत गोरोबा काका सेवा मंडळ आणि साई श्रद्धा मित्र मंडळ चिरनेर कलानगर येथील पदाधिकाऱ्यांनी त्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

### उरणमध्ये विविध धार्मिक उपक्रम

**उरण :** त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त सदगुरू श्री अनिरुद्ध उपासना केंद्र उरण व मुळेखंड तर्फे हॉटेल आनंदी, कोटनाका येथे सदगुरू श्री अनिरुद्ध बापू ह्यांचे पादुका पूजन आयोजित केले होते. त्या निमित्ताने २०० श्रद्धावान सेवक एकत्र आले होते व सायंकाळी जल्लोषात सत्संग, आरती व गजर घेण्यात आले. त्रिपुरारी पौर्णिमाला सदगुरू अनिरुद्ध यांचा वाढदिवस असल्याने संपूर्ण बापू भक्त कुटुंबात हा दिवस उत्साहाने भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात येतो.



# 'अटल करंडक'मध्ये नाट्यकर्मी किशोर जोशींच्या नावे पारितोषिक

## आमदार प्रशांत ठाकूर यांची घोषणा



(छाया : योगेश पाटील)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अटल करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेमध्ये यावर्षापासून नाट्यकर्मी किशोर जोशी यांच्या नावे पारितोषिक मिळणार असल्याची घोषणा भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली. ज्येष्ठ नाट्यकर्मी किशोर गजानन जोशी यांच्या तैलचित्राचे भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत सोमवारी (दि. ७) अनावरण झाले. या वेळी ते बोलत होते.

पनवेल येथील ज्येष्ठ नाट्यकर्मी किशोर गजानन जोशी यांचे तैलचित्र ज्येष्ठ नेते चंद्रशेखर सोमण यांनी आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहासाठी दिले आहे. या तैलचित्राचे अनावरण भाजपचे जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर प्रमुख उपस्थितीत आणि पनवेल महापालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांच्या हस्ते झाले.

या कार्यक्रमाच्या वेळी माजी नगरसेवक अनिल भगत, नितीन पाटील, अॅड. मनोज भुजबळ, भाजप सांस्कृतिक सेलचे शहर मंडल संयोजक अभिषेक पटवर्धन, कल्पना कोठारी, कामोठे शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, चंद्रशेखर सोमण, किशोर जोशी, प्रथमेश सोमण, बबन मुकादम, नाट्यकर्मी किशोर गजानन जोशी यांचे सुपुत्र चेतन जोशी, शोभा जोशी, श्रीधर साळवी, स्नेहा सुमन यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

तैलचित्राचे अनावरण सोहळ्यात आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, दरवर्षी अटल बिहारी वाजपेयी यांच्या नावाने अटल करंडक एकांकिका स्पर्धा आयोजित करतो तर त्या स्पर्धेमध्ये उत्कृष्ट वेशभूषा यासाठीचा पारितोषिक नाट्यकर्मी किशोर गजानन जोशी यांच्या नावाने दिली पाहिजे त्याच्या अंमलबजावणीला या वर्षापासून सुरुवात करू, असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले.

# वीर वाजेकर विद्यालयाच्या मैदानाची सफाई

**उरण : प्रतिनिधी, बातमीदार**

पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मैदानावर योग्यरित्या सराव करता यावा या दृष्टीकोनातून विजय विकास सामाजिक सामाजिक संस्था उरण व मॉर्निंग वॉक ग्रुपच्या संयुक्त विद्यमाने फुंडे येथील वीर वाजेकर विद्यालयाच्या प्रांगणात, मैदानात असलेली झाडी-झुडपे काढून साफसफाई करण्यात आली. संस्थेच्या सदस्यांनी मिळून मैदान स्वच्छ व सुंदर केले.

फुंडे येथील वीर वाजेकर महाविद्यालयाच्या मैदानावर सर्वत्र गवत, झाडीझुडपी असल्याने तरुणांना पोलीस भरतीचा सराव करता येत नव्हता. ही समस्या विजय विकास सामाजिक संस्थेचे अध्यक्ष विजय भोईर यांच्या कानावर टाकली. लगेचच ही समस्या विजय भोईर यांनी विजय विकास सामाजिक संस्था व मॉर्निंग वॉक ग्रुपच्या सर्व पदाधिकारी सदस्यांना सांगितली. हा विषय विजय विकास सामाजिक संस्था व मॉर्निंग वॉक ग्रुपच्या पदाधिकारी व सदस्यांच्या लक्षात येताच लागलीच त्यांनी स्वत: हातात झाडू, मशिन, अवजारे घेऊन परिसराची साफसफाई केली. स्वतः विजय भोईर व सर्व पदाधिकारी ६ नोव्हेंबरपासून गवत, झाडी झूडपे काढण्याचे, साफसफाई करण्याचे काम करत आहेत. अजूनही हे साफसफाईचे काम सुरूच आहे.

विजय विकास सामाजिक संस्था व मॉर्निंग वॉक ग्रुपने सामाजिक बांधिलकी जपत केलेल्या या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. या वेळी विजय विकास सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विजय भोईर तथा जिल्हा परिषद सदस्य, फुंडे कॉलेजचे प्राचार्य प्रल्हाद पवार, पंचायत समिती सदस्य दीपक ठाकूर, सुदीप रोडलाईन्सचे मालक सुदीप पाटील, शिक्षक सेनेचे अध्यक्ष विकास ठाकूर, जेएनपीटीचे एचआर मॅनेजर भरत मढवी आदी या वेळी उपस्थित होते.



# भ्रष्टाचार निर्मूलनांतर्गत विद्यार्थ्यांसाठी निबंध, चित्रकला स्पर्धा

**पनवेल : वार्ताहर**

बँक ऑफ महाराष्ट्र ही आपल्या बँकिंग सेवे सोबतच सामाजिक कार्यात सुद्धा नेहमीच अग्रेसर असते. अशाच एका सामाजिक उपक्रमात बँकेने पुढाकार घेतला तो म्हणजे भ्रष्टाचार निर्मूलनाचा. या अनुषंगाने बँकेने बांठिया हायस्कूल, नवीन पनवेल येथे विद्यार्थ्यांसाठी निबंध व चित्रकलेची स्पर्धा आयोजित केली होती. ह्या स्पर्धेत २०० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.



या वेळी बँकेच्या महाप्रबंधक व झोनल मॅनेजर मा. अपर्णा जोगळेकर, बांठिया हायस्कूलचे प्राचार्य माळी सर, पर्यवेक्षक जे. के. कुंभार, बी. यु. महाजन, एस. एल. पवार, बँकेच्या अधिकारी पूनम गर्जे व विशेष सहाय्यक अरविंद मोरे उपस्थित होते.

झोनल मॅनेजर जोगळेकर यांनी स्पर्धा आयोजनाचा उद्देश सांगितला. सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. प्राचार्य माळी सर बँकेने राबविलेल्या उपक्रमाचे व विद्यार्थ्यांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

या स्पर्धेत खालील विद्यार्थ्यांनी बक्षिसे पटकाविलीत त्यामध्ये निबंध स्पर्धा प्रथम रीमा राजेश पवार, द्वितीय दिया रवींद्र पोटे, तृतीय तेजस्वी नरेश खरगावकर, चित्रकला स्पर्धा प्रथम पियुष नारायण चव्हाण, द्वितीय वेदांत नाना खरात, तृतीय रेणुमा साजिद अन्सारी. स्पर्धेतील विजेते विद्यार्थ्यांना बँकेच्या झोनल मॅनेजर, अपर्णा जोगळेकर व प्राचार्य ममाळी सर यांच्या हस्ते स्मुर्तिचिन्ह व गुलाब पुष्प देऊन गौरविण्यात आले.

प्रास्ताविक बँकेचे विशेष सहाय्यक अरविंद मोरे यांनी केले तर सूत्रसंचालन व आभार राजश्री गुंड यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशश्वीतेकरिता अरविंद मोरे, महाजन, विजयकुमार जंगम, ज्ञानेश्वर पवार, योगिता पाटील व ज्योती यांनी परिश्रम घेतले.

# पनवेलच्या रामेश्वर महादेव मंदिरात दीपोत्सव

## त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त परिसर दिव्यांनी लखलखला





(छाया : संकेत भोईर)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

त्रिपुरारी पौर्णिमेचे औचित्य साधून पनवेल नगरीतील ऐतिहासिक वारसा लाभलेल्या रामेश्वर महादेव मंदिरात सोमवारी (दि. ७) दीपोत्सव साजरा करण्यात आला. या वेळी संपूर्ण परिसर दीपोत्सवाने उजळून निघाला.

कार्तिक पौर्णिमेला त्रिपुरारी पौर्णिमा किंवा त्रिपुरी पौर्णिमा असेही म्हटले जाते, या दिवशी शिवमंदिरात दिव्यांची वात लावली जाते. हिंदू धर्मात अनन्यसाधारण महत्त्व असलेल्या कार्तिक पौर्णिमेला अनेक ठिकाणी दीपोत्सवही साजरा केला जातो. या दिवशी भगवान शंकराने अखंड भूमीवरून जनतेला त्रास देणाऱ्या त्रिपूर राक्षसाचा वध केला. म्हणून या पौर्णिमेला त्रिपुरी किंवा त्रिपुरारी पौर्णिमा असे म्हणतात, त्याचेच औचित्य साधून रामेश्वर महादेव मंदिरात भगवान शंकरापुढे आरती व त्रिपूर वात लावून उत्सव साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन जाणीव एक सामाजिक संस्थेचे अध्यक्ष माजी नगरसेवक नितीन पाटील व उत्तर रायगड जिल्हा कार्यकारिणी सदस्य तथा मंदिराचे अध्यक्ष उमेश इनामदार आणि यांनी केले होते.

या दीपोत्सवाला माजी सभागृह नेते परेश ठाकूर, शहर अध्यक्ष जयंत पगडे, जाणीव एक सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी नगरसेवक नितीन पाटील, माजी नगरसेविका निता माळी, पोलीस उपायुक्त शिवराज पाटील, प्रादेशिक परिवहन अधिकारी धोटे, दिनेश बागुल, श्री रामेश्वर महादेव देवस्थानचे अध्यक्ष उमेश इनामदार, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, सोशल मीडिया सेलचे शहर संयोजक प्रसाद हनुमंते, महिला मोर्चाच्या लीना पाटील तसेच मंदिराचे विश्वस्त, कार्यकर्ते व भाविकगण उपस्थित होते.

# चोरीच्या इराद्याने बंदुकीचा धाक दाखवणाऱ्यांना बेड्या

**उरण : प्रतिनिधी, बातमीदार, वार्ताहर**

धनत्रयोदशीला द्रोणागिरी नोडमधील मॅजेस्टीक व्हीला येथील एम गोल्ड ज्वेलर्समध्ये एका अज्ञात व्यक्तीने रिव्हॉल्वर घेऊन चोरीच्या इराद्याने दुकानात काम करणाऱ्यांना धमकावले होते. दुकान मालकाने सायरन वाजविल्याने चोराने घाबरून साथीदारांसोबत पलायन केले होते. पोलिसांनी या घटनेचा तपास करून आरोपींना ताब्यात घेतले आहे.

उरण पोलीस ठाण्यात या घटनेची नोंद होताच पोलिसांनी घटनास्थळावरील मार्गावर असलेल्या सीसीटीव्ही फूटेजची पाहणी केली. त्यानुसार इनोवा कारचा एमएच ४३ एक्स ७०७७ असा नंबर असल्याचे दिसून आला. गाडीच्या फास्टटॅगला संलग्न असलेल्या मोबाइल नंबरवरून गाडीमालकाची माहिती प्राप्त करण्यात आली. त्यानंतर इनोवा कारचालक अंकुश अश्रुबा जाधव (वय ४४, रा. साकीनाका, मुंबई) याची सखोल माहिती घेऊन सानपाडा येथून ताब्यात घेण्यात आले. त्याने आरोपी एजाज अब्दुल करीम चैधरी (रा. उल्हासनगर) याच्या सांगणेवरून इनोवा गाडी भाड्याने घेतल्याचे समजले. आरोपीविरोधात विविध प्रकारचे गुन्हे दाखल आहेत. आरोपींनी गुन्ह्यात वापरलेली दोन लाख ५० हजारांची इनोवा कार हस्तगत करण्यात आली आहे, अशी माहिती उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक सुनील पाटील यांनी दिली आहे.

## संपादकीय

# सभ्यतेच्या मर्यादा पाळा

राजकारण हे लोकशाही व्यवस्थेमध्ये समाजकारणापासून वेगळे काढता येत नाही. किंबहुना, सत्तेसाठी केलेले राजकारण अंतिमत: समाजासाठी केलेले असते. समाजामध्ये वावरताना लोकप्रतिनिधींनी अधिक भान बाळगायला हवे ते याच कारणासाठी, परंतु गेल्या काही दशकांत राजकारणाचा स्तर दिवसेंदिवस खालावत चाललेला दिसतो आहे. समाजकारणाने तर राजकीय खेळापासून केव्हाच फारकत घेतलेली दिसते. लोकांनी निवडून दिलेले प्रतिनिधी हे मूलत: जनतेचे सेवक असतात हे लोकशाहीचे मूलतत्त्व इतिहासजमा झाल्यासारखे काहींचे वर्तन आहे.

**पंतप्रधान नरेंद्र मोदी हे स्वत:ला ‘प्रधान सेवक’ म्हणवून घेतात आणि ती सेवकाची भूमिका अभिमानाने सांगतात. जनतेने आपल्याला सत्तेची सूत्रे सोपवलेली आहेत. त्या जनतेच्या विश्वासाला तडा जाईल असे वर्तन होणार नाही यासाठी पंतप्रधान मोदी नेहमीच दक्ष राहिले आहेत. गुजरातचे मुख्यमंत्री असतानाही आपल्या मंत्रिमंडळातील सदस्यांचे वर्तन आणि भाषा बिघडणार नाही याकडे ते करड्या नजरेने लक्ष ठेवून असत. त्यांच्या प्रेमळ धाकाची अनेक उदाहरणे गुजरातमध्ये राजकीय वर्तुळात चर्चिली जातात. महाराष्ट्रात मात्र अलीकडच्या काळात सगळाच सावळागोंधळ झाला आहे. एकमेकांवर वारेमाप चिखलफेक करणे, वाटेल तसे आरोप करणे असे प्रकार आता नित्याचे झाले आहेत. शिंदे-फडणवीस सरकार सत्तेवर आल्यानंतर महाविकास आघाडीच्या नेत्यांना तोंड लपवून पळ काढावा लागला. उभी फूट पडलेल्या उरल्यासुरल्या शिवसेनेचे नेतृत्व करण्याचे उद्धव ठाकरे यांच्या नशिबी आले. या सगळ्या घटनांची मालिका पाहिली तर विरोधकांना नैराश्य येणे स्वाभाविकच होते हे समजून घेता येते. या नैराश्यापोटी शिवसेना-उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षातील अपयशी नेत्यांनी बाळासाहेबांच्या शिवसेनेविरोधात वारेमाप आरोपांची आणि चिखलफेकीची अक्षरश: राळ उठवली. सूरत-गुवाहाटी येथील राजकीय सत्तानाट्य सुरू होते, तेव्हा शिवसेनेचे तत्कालीन प्रवक्ते संजय राऊत कुठल्या भाषेत बोलत होते हे महाराष्ट्रातील जनता अजून विसरलेली नाही. बंडखोर आमदारांना बळीचे रेडे व अन्य नाही-नाही ती विशेषणे लावून राऊत आणि त्यांचे सहकारी प्रछन्न टीका करत असत. बंडखोर महिला आमदारांबाबत अत्यंत अश्लाघ्य स्वरूपाची शेरेबाजी करण्यास त्यांनी कमी केले नाही. राऊत आणि त्यांचे पक्ष सहकारी पातळी सोडून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर विशेषत्वाने टीका करत होते. तेव्हा त्यांना रोखण्याचे काम महाविकास आघाडीच्या एकाही नेत्याने केले नाही. गेली अडीच वर्षे हेच महाविकास आघाडीचे नेते पंतप्रधान मोदींपासून भाजपचे ज्येष्ठ नेते चंद्रकांत पाटील यांच्यापर्यंत सर्वांवर अश्लाघ्य भाषेत टीकाटिप्पणी करत होते. खुद्द उद्धव ठाकरे यांनी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची कुळे उद्धरली होती. तसेच मुख्यमंत्री शिंदे यांच्या नातवाचा उल्लेख करून जहरी टीका करण्याची संधीही त्यांनी सोडली नव्हती. राजकारणाच्या भूमीत जसे पेराल तसे उगवते. त्याचेच प्रत्यंतर सध्या येत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या सुप्रिया सुळे यांच्याबद्दल कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांनी जे काही अपशब्द उच्चारले त्याचे समर्थन मुळीच करता येणार नाही. राजकारणात सर्वांनीच आपल्या भाषेचे आणि संस्कृतीचे भान ठेवण्याची नितांत आवश्यकता आहे. सध्याच्या काळात तर हे भान नेत्यांनीच नव्हे तर साध्यासुध्या कार्यकर्त्यांनीदेखील ठेवायला हवे. राजकारण शेवटी लोकांसाठी असते व लोक सारे पाहात असतात.**

# स्मार्ट सिटीच्या रेल्वे स्टेशनसाठी प्रतीक्षा



**खबरबात**
**नितीन देशमुख**

पनवेल महापालिका हद्दीतील खारघर स्मार्ट सिटी म्हणून ओळखले जाते, पण या शहराचा विकास करताना मागील सरकारच्या काळात सिडकोने अनेक त्रुटी ठेवल्याने नागरिकांना अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. येथील रेल्वे स्टेशनही त्याला अपवाद नाही. त्यामुळे रोज हजारो नागरिकांना त्याचा त्रास सहन करावा लागत असल्याचे दिसून येत आहे. रेल्वे आणि सिडको प्रशासन यांच्या कात्रीत सापडलेल्या खारघर स्टेशनची अवस्था मात्र अडकित्त्यातील सुपारीसारखी झाली आहे. २०२३मध्ये तरी आम्हाला सुविधा मिळतील, अशी अपेक्षा खारघरवासीय करीत आहेत.

मुंबईत होणारी गर्दी कमी करण्यासाठी राज्य शासनाने १९७०मध्ये सिडकोची स्थापना केली. नवी मुंबईच्या निर्मितीचे काम सिडकोला देण्यात आले. वाशी, नेरूळ आणि बेलापूरपाठोपाठ खारघरची निर्मिती करण्यात आली. रेल्वेच्या हार्बर लाईनवर खारघर स्टेशन येत असल्याने त्याची बांधणी करण्याची जबाबदारी ही सिडकोने घेतली. हे स्टेशन बांधताना शहराचा विकास होत असल्याने येथील लोकसंख्या भविष्यात वाढणार आहे याचा विचार मात्र सिडकोने केलेला दिसत नाही. त्यामुळेच दररोज ३३३ लोकलच्या फेऱ्या असलेल्या स्टेशनवर नागरिकांना सुविधा पुरवण्यात सिडको आणि रेल्वे अपयशी ठरलेली पाहायला मिळते.

प्रत्येक फलाटावर स्वच्छतागृहाची आवश्यकता असताना सिडकोने मात्र स्टेशनच्या बाहेर स्वच्छता गृह बांधली आहेत. येथील रेल्वे स्टेशनवर महिला व पुरुषांसाठी असलेल्या स्वच्छता गृहात पाऊल टाकताच भिंतीवर लटकवलेले कपडे दिसतात. त्यामुळे आपण नक्की कोठे आलो आहोत हे नवीन माणसाला समजत नाही. तो गोंधळून जातो.



याबाबत स्वच्छतागृहातील माणसाला विचारले असता हे कपडे बाहेर बसलेल्या बूट पॉलिश व फेरीवाल्यांचे असल्याचे त्याने सांगितले. स्वच्छता गृहात सगळीकडे घाणच आहे. त्यातच भाजी व फळवाल्यांच्या टोपल्या ठेवलेल्या दिसतात. महिलांच्या स्वच्छता गृहाच्या मागील बाजूच्या काचा फुटून गेल्या आहेत. त्यामुळे बाहेरून कोणी डोकावू शकतो किवा शूटिंग करू शकतो. सल्लागार समितीच्या बैठकीत रेल्वेच्या अधिकाऱ्यांना याबाबत विचारले असता येथील व्यवस्था सिडकोकडे आहे आमचे अधिकारी त्याची नियमित पाहणी करून फोटो पाठवतात असे सांगण्यात आले. या ठिकाणी जाऊन पाहणी केली असता कोणताही बदल दिसून आला नाही. मग रेल्वेचे कर्मचारी कसली पाहणी करतात आणि कोणते फोटो पाठवतात याची माहिती रेल्वेचे विभागीय वाणिज्य अधिकाऱ्यांनी द्यावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

या स्टेशनवर फलाटावरून बाहेर येण्यासाठी अपंगासाठी बनवलेल्या मार्गावर उजेड येण्यासाठी असलेले लाईट चालू नसल्याने काळोख असतो. याबाबत एका अपंग व्यक्तीने अपघात होण्याची भीती व्यक्त करून प्रशासन लाईट लावण्यासाठी अपघात होण्याची वाट पाहत असल्याचे सांगितले. येथील भुयारी मार्गात किंवा बूकिंग विंडोजवळ इंडिकेटरची ही सुविधा नाही. कोणत्या फलाटावर कोणती गाडी येणार याची माहिती मिळत नसल्याने ज्येष्ठ नागरिकांची मोठी अडचण होत असते. येथील फलाटावरील इंडिकेटर ही अनेक वेळा बंद असतात.

खारघर स्टेशनला सकाळी गर्दीच्या वेळी दोनच बुकिंग विंडो उघड्या असतात त्यामुळे मोठ्या लाईन लागलेल्या दिसतात. त्यामुळे अनेकांच्या गाड्या चुकतात कामावर उशिरा गेल्याने लेट मार्क मिळतो. रेल्वे स्टेशनवर असलेली तिकिटाची मशीन बहुतेक वेळा बंद असतात आणि जे मशीन सुरू असेल तेथे एजंट तिकीट देण्याचे काम करी असतात. यासाठी जादा विंडो उघडण्याची मागणी केली असता रेल्वेने खासगी एजंटला स्टेशनच्या बाहेर जागा दिली. त्यामुळे प्रवाशांना प्रत्येक तिकिटामागे एक रुपया जास्त द्यावा लागतो याबद्दल अनेकांनी नाराजी व्यक्त केली.

प्रत्येक रेल्वे स्टेशनला भेडसावणारी सगळ्यात मोठी समस्या म्हणजे पार्किंगची. खारघरला पार्किंगची समस्या गंभीरच आहे. सिडकोने खारघर स्टेशनची उभारणी करताना स्टेशनचेवर चार हजार वाहने उभी राहतील असा वाहनतळ उभारला होता. हा वाहनतळ आता अपुरा पडत असल्याने रिक्षा स्टँडसमोरील जागेत वाहनतळ सुरू करण्यात आला. तो ही कमी पडल्याने अनेक गाड्या रस्त्याचा बाजूला उभ्या करून ठेवण्यात आलेल्या दिसतात. या स्मार्ट सिटीची वाढती लोकसंख्या पाहता दुसरा कोणताच उपाय नसल्याने सध्या आहे त्या जागेतच वाहने उभी करावी, असे या बाबत सिडकोने सांगितले.






## बदलते तंत्रज्ञान

# मोबाइल हॅक झालाय? ‘या’ संकेतांमधून ओळखा

आजकाल प्रत्येकजण मोबाइलचा वापर सर्रास करताना दिसतो. मोबाइल जीवनाचा अविभाज्य भाग बनत चालला आहे. जेव्हा मोबाइल नव्हता तेव्हा लोक एकमेकांसोबत बोलत नव्हते अशातला भाग नाही, मात्र मोबाइल आले संवाद आणखी सोपा झाला. स्मार्टफोनच्या येण्याने सगळी काम खूप सोपी झाली. अनेक काम सोपी झाली खरी पण तितकेच त्याचे धोकेसुद्धा वाढले. कारण मोबाइलमध्ये आपले अतिशय महत्वाची माहिती बँक अकाउंट डिटेल्स पर्सनल डेटा सगळं काही सेव्ह असत. आणि अशावेळी मोबाइल हॅक होण्याचं प्रमाण वाढतं. यानंतर आपला महत्त्वाचा डेटा चोरीला जाऊ शकतो.आपलं मोठ्या प्रमाणात नुकसान होत.



अनेकवेळा युजर्सना आपला मोबाइल हॅक झाल्याचेही कळत नाही. हॅकर्स तुमचा सर्व पर्सनल डेटा चोरून त्याचा गैरवापर करू शकतात आणि अशा अनेक घटना घडलेल्या आहेत. बँक खात्यातील पैसे काढणे ते अगदी तुम्हाला ब्लॅकमेल करण्यापर्यंत सगळं काही घडत. पण तुम्हाला माहीत आहे का, मोबाइल हॅक झालाय हे तुम्ही ओळखू शकता आणि वेळीच सावध होऊ शकता.

**कसं समजेल तुमचाही मोबाइल झालाय हॅक –** मोबाइलचा स्पीड अचानक कमी होणे किंवा तो सतत हँग होऊ लागतो.. अनेकदा असं होत आतापर्यंत फोन चांगला चालेल असतो आणि अचानक तो हँग होऊ लागतो अशा वेळी समजून जायचं कि फोनमध्ये मॅलवेअर आहे. चांगला चालणारा फोन अचानक स्लो काम करू लागतो आणि आपल्याला वाटतं कि कदाचित फोन हँग होतोय पण यामागे हॅकिंग हेसुद्धा कारण असू शकतं.

**मोबाइल सेन्सर आणि बॅटरी –** वारंवार चार्ज करूनसुद्धा फोनची बॅटरी उतरत असेल मोबाईल स्क्रीन बंद केल्यावरसुद्धा अ‍ॅप काम करत असतील तर सावध व्हा कारण कोणीतरी तुमचा मोबाईल हॅक करत आहे. मोबाइलचे सेन्सर पुन्हा पुन्हा डिटेक्ट होऊ लागतात. हे देखील मोबाईल हॅक होण्याचं चिन्ह आहे.

**कॉल आणि एसएमएस –** बऱ्याचदा आपल्याला विशिष्ठ डिजिट असणाऱ्या नंबरवरून कॉल येतात मेसेजेस येतात आणि आपण त्यावर क्लिक करतो अजाणतेपणी केलेलं एक क्लिक तुमचा मोबाईल हॅक व्हायला पुरेसा आहे.

# प्रसिद्ध अभिनेते बाबूराव पेंढारकर



**निमित्त**

मराठी चित्रपटसृष्टीतील अतिशय हरहुन्नरी कलाकार म्हणून बाबूराव गोपाळ पेंढारकर यांचा उल्लेख करावा लागेल. कंपनीत व्यवस्थापक म्हणून काम करता करताच त्यांनी अभिनयात मोठी मजल मारली आणि चित्रपटसृष्टीत स्वत:चे स्थान निर्माण केले. ९ नोव्हेंबर हा त्यांचा स्मृती दिन आहे.

पेंढारकर यांचा जन्म कोल्हापूरला झाला. त्यांच्या वडिलांचे नाव गोपाळराव, आईचे नाव होते राधाबाई. त्यांचे वडील कोल्हापूरमध्ये नावाजलेले डॉक्टर होते, मात्र बाबूरावांचे शिक्षण यथातथाच होते. सुरुवातीच्या काळात त्यांनी पन्हाळ्याच्या शाळेत इंग्रजीचे शिक्षक म्हणून नोकरी केली. तेथे नोकरीत करत असतानाच त्यांचे लग्न झाले आणि ते कोल्हापूरला आले. काही काळ एका होमिओपॅथीच्या डॉक्टरांच्या दवाखान्यात त्यांनी कंपाऊंडर म्हणून नोकरी केली. नंतर बाबूराव पेंटर यांनी पेंढारकरांना महाराष्ट्र फिल्म कंपनीत काम करण्यासाठी बोलावून घेतले आणि तिथेच ‘सैरंध्री’ चित्रपटाद्वारे बाबूरावांनी अभिनयाचा श्रीगणेशा सुरू केला. ‘सैरंध्री’ चित्रपट त्या काळात खूप गाजला.

महाराष्ट्र फिल्म कंपनीत बाबूराव सुरुवातीला सेवक आणि नंतर व्यवस्थापक म्हणून काम करीत होते, त्या वेळी त्यांना १५ रुपये पगार मिळत होता. १९२३ साली पेंढारकरांनी महाराष्ट्र फिल्म कंपनी सोडली. काही काळ कॉर्पोरेशन कंपनीत काम केले. ‘प्रभावती’ नावाच्या एकाच चित्रपटात त्यांनी काम केले आणि डेक्कन कॉर्पोरेशन कंपनीही सोडली. पुढे भालजी पेंढारकर, बाबूराव पेंढारकर आणि पार्श्वनाथ आळतेकर यांनी ‘वंदे मातरम’ कंपनीची स्थापना केली आणि ‘वंदे मातरम’ या मूकपटाची निर्मिती केली. हा चित्रपट चालला नाही आणि ‘वंदे मातरम’ कंपनी त्यामुळे बंद पडली. पुढे ‘प्रभात’ कंपनीत बाबूराव नोकरीला लागले. ते व्यवस्थापक म्हणून काम करत असले तरी कंपनीतील सर्व प्रकारची कामे शिकून घेण्याचा निश्चय केला. कंपनीतील पत्रव्यवहार, करारमदार करणे, चित्रपटासाठी लहानमोठे कलावंत निवडणे, अन्य कामगारांची व्यवस्था, चित्रीकरणाची तयारी अशा प्रकारची कामे बाबूराव करत होते. ‘बजरबट्टू’ या ‘प्रभात’च्या मूकपटात पेंढारकरांनी खलनायकाची भूमिका केली. ही भूमिका गाजली आणि उत्तम खलनायक म्हणून बाबूरावांचा लौकिक झाला. पुढे प्रभात फिल्म कंपनीत बाबूरावांनी कथानक, दिग्दर्शन, छायालेखन या क्षेत्रांचाही सूक्ष्मतेने अभ्यास केला. ‘जुलूम’, ‘अयोध्येचा राजा’, ‘जलती निशानी’, ‘अग्निकंकण’ अशा चित्रपटांत त्यांनी सुरुवातीच्या काळात खलनायकाच्या भूमिका केल्या. त्यांची ‘सिंहगड’ चित्रपटातील ‘उदयभानू’ ही भूमिका जाणकार प्रेक्षकांकडून आणि टीकाकारांकडूनही गौरवली गेली. मात्र ‘प्रभात’च्या ‘अयोध्येचा राजा’ चित्रपटातील ‘गंगानात’च्या भूमिकेनेच बाबूरावांना खऱ्या अर्थाने लोकप्रियता मिळून दिली. त्यांचे अस्थिर संघर्षमय जीवन संपून आर्थिकदृष्ट्याही स्थैर्य मिळाले.

पेंढारकर यांचा ‘छाया’ चित्रपटही गाजला. १९३९ साली हंस पिक्चर्सचा ‘देवता’ चित्रपट प्रदर्शित झाला. या चित्रपटात बाबूराव पेंढारकरांनी प्रथमच नायकाची भूमिका केली आणि आपल्या समर्थ अभिनयाच्या बळावर ‘सुखाचा शोध’, ‘देवता’, ‘पैसा बोलतो आहे’, ‘पहिला पाळणा’ अशा अनेक चित्रपटांत नायकाची व्यक्तिरेखा साकारली. ‘सीमेवरून परत जा’ आणि ‘वाहतो ही दुर्वांची जुडी’ या नाटकाचे बाबूराव पेंढारकर आणि बाळ कोल्हटकर हे सूत्रधार होते. त्यांनी भागीदारीत ‘दुर्वांची जुडी’ ही संस्था स्थापन केली आणि ‘वाहतो ही दुर्वांची जुडी’ या नाटकाचे ५०० प्रयोग केले. कर्करोगाने कोल्हापूर येथे त्यांचे निधन झाले. पुढे त्यांचे पुत्र श्रीकांत पेंढारकर यांनी ‘बाबूराव नावाचे झुंबर’ हे त्यांच्या आठवणीचे पुस्तक प्रकाशित केले. केशवराव भोसले नाट्यगृहात त्यांचा अर्धपुतळाही उभारला गेला.

**–स्नेहा अवसरीकर**

**क्लिक...क्लिक...!**



**उरण : दरवर्षी ऑक्टोबर महिन्याच्या प्रारंभी कोकणाकडे आपली मेंढरे घेऊन येणारे मेंढपाळ यंदा परतीच्या पावसाने घातलेल्या धुमाकूळामुळे एक महिना उशिरा मेंढरे घेऊन येताना दिसत आहेत. मेंढपाळ हे कोकण विभागात मेंढ्यांना पुरेसा चारा मिळत असल्याने मागील कित्येक वर्षे मेंढरे चारण्यासाठी येत असतात. चिरनेर-खारपाडा रोडवरील पात्रादेवी घाटातून मार्गक्रमण करीत असताना शंभरहून मेंढ्या घेऊन जाणारे मेंढपाळ.** (छाया : जीवन केणी)

## आरोग्य प्रहर

# उत्तम आरोग्यासाठी प्या हळदीचा रस!

हळदीचा दीर्घकाळापासून औषध म्हणून वापर केला जात आहे आणि त्यावर अनेक संशोधने झाली आहेत. शरीरातील विषारी द्रव्ये बाहेर काढण्यासाठी आणि रक्त शुद्धीकरणासाठी हळदीचा वापर अतुलनीय आहे. हे शरीराच्या प्रत्येक अंतर्गत भागासाठी अनेक प्रकारे फायदेशीर आहे. याचा वापर तुम्ही अनेक प्रकारे करू शकता, त्यातील एक म्हणजे हळदीचा रस. ते कसे बनवायचे ते जाणून घ्या.



हळदीचा रस तयार करण्यासाठी आपल्याला आवश्यक आहे कच्च्या हळदीचा तुकडा किंवा हळद पावडर, लिंबू आणि मीठ. कृती – ते तयार करण्यासाठी प्रथम अर्धा लिंबू पिळून त्यात हळद आणि मीठ एकत्र करून मिक्सरमध्ये किंवा ब्लेंडरमध्ये मिसळा. आता या मिश्रणात गरजेनुसार पाणी घालून सेवन करा हे थंड स्वभावाच्या लोकांसाठी खूप फायदेशीर सिद्ध होईल, जे आरोग्याबरोबरच सौंदर्याशी संबंधित फायदे देखील देईल. हे रक्त शुद्ध करण्यासाठीदेखील उपयुक्त आहे आणि रोगप्रतिकार शक्ती वाढवण्यासाठीदेखील एक उत्तम उपाय आहे.

**फायदे –**

* कच्च्या हळदीमध्ये कर्करोगाशी लढण्याचे गुणधर्म असतात.
* हे प्रोस्टेट कर्करोगाच्या पेशींची वाढ रोखण्यासाठी उपयुक्त आहे, विशेषतः पुरुषांमध्ये.
* हे हानिकारक किरणोत्सर्गाच्या संपर्कात आल्याने होणाऱ्या ट्यूमरपासून देखील संरक्षण करते.
* याचा उपयोग जळजळ, संधिवात, फ्री रॅडिकल्स आणि सांधेदुखीवर फायदेशीर आहे.
* इन्सुलिनची पातळी संतुलित ठेवते आणि मधुमेहामध्ये फायदेशीर आहे.
* यामध्ये अँटीबॅक्टेरियल आणि अँटी सेप्टिक गुणधर्म असतात.
* यात सोरायसिस सारख्या त्वचेच्या आजारांपासून संरक्षण करण्याचे गुणधर्म आहेत.
* रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते.
* हळदीमध्ये वजन कमी करण्याचा गुणधर्म आहे.
* संशोधन सिद्ध करते की हळद यकृत देखील निरोगी ठेवते.

**(सावधानता – जर तुमची तासीर गरम असेल तर ते काळजीपूर्वक वापरा किंवा सेवन करण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घ्या.)**

# जिल्हा रुग्णालयाच्या अनागोंदीविरोधात शिंदे गट आक्रमक

## शल्यचिकित्सकांना घातला घेराव / बालमृत्यूसह विविध मुद्द्यांवर प्रश्नांची सरबत्ती

**अलिबाग : प्रतिनिधी**

येथील जिल्हा रुग्णालयाच्या अनागोंदी कारभाराविरोधात शिवसेना शिंदेगटाचे जिल्हाप्रमुख राजा केणी आणि माजी जि. प. सदस्या मानसी दळवी यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी मंगळवारी (दि. ८) जिल्हा रुग्णालयात धडक दिली. अनेक समस्यांचा पाढा वाचून जिल्हा शल्यचिकीत्सक डॉ. सुहास माने यांना अक्षरशः भंडावून सोडले. जिल्हा रुग्णालयात गेल्या सात महिन्यात ४९ नवजात बालके दगावली. या गंभीर मुद्द्यांवर माने यांना चांगलेच धारेवर धरले.

मागील काही दिवसांत जिल्हा रुग्णालयात नवजात बालकांच्या मृत्यूचे प्रमाण वाढले आहे. त्याबाबत शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांनी डॉ. माने यांना जाब विचारला. त्यावर माने यांना समाधानकारक उत्तरे देता आली नाहीत. प्रसुतीसाठी येणारया गर्भवती महिला किंवा त्यांच्या नातेवाईकांकडून संबंधित डॉक्टर पैसे उकळतात अशी तक्रार या वेळी करण्यात आली. त्यावर लवकरच उपाययोजना करण्यात येईल आणि अशा तक्रारी आल्यास संबंधित डॉक्टरांवर कडक कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन डॉ. माने यांनी दिले.

रुग्णालयातील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचे मागील काही महिन्यांपासून पगारच झालेले नाहीत. रुग्णालयात डॉक्टर वेळेवर उपलब्ध होत नाहीत, अशा तक्रारी करण्यात आल्या. दुसरीकडे रुग्णालयाच्या इमारतीत सातत्याने पडझड होत असते. त्यामुळे छोटे-मोठे अपघात होतात, असे अनेक मुद्दे उपस्थित करण्यात आले. यासंदर्भात लवकरच आरोग्यमंत्र्यांना भेटून कारभाराची लक्तरे सरकार दरबारी टांगण्यात येतील. कारभार सुधारा नाही तर आक्रमक आंदोलन करू, असा इशाराही या वेळी राजा केणी आणि मानसी दळवी यांनी दिला.



| नवजात बालकांचे मृत्यू | |
|---|---|
| एप्रिल - १३ | मे - ०७ |
| जून - ०७ | जुलै - ४ |
| ऑगस्ट - ०६ | सप्टेंबर - ०८ |
| ऑक्टोबर - ०४ | |

### दोन अधिकाऱ्यांचीच जुंपली

*आज शिवसेना शिंदे गटाने जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने यांना त्यांच्या दालनातच घेराव घातला. या वेळी रुग्णालयातील अधिकारी कर्मचारीदेखील उपस्थित होते. यामध्ये डॉ. माने हे रुग्णालयातील अधिकारी कर्मचाऱ्यांना त्रास देत असल्याचा मुद्दे चर्चेला आला. त्याच वेळी अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक प्रमोद गवई यांनी संधी साधत या आरोपाला पुष्टी दिली आणि आपलीही रजा मंजूर करत नसल्याचे सांगितले. त्यावरून या दोन्ही अधिकाऱ्यांमध्ये चांगलीच जुंपली. दोघेही एकमेकांवर चिखलफेक करीत होते.*

**जिल्हा रुग्णालयात अलिकडे नवजात बालकांच्या मृत्यूचे प्रमाणही वाढले आहे. शिवाय इथे येणाऱ्या रूग्णांची डॉक्टरांकडून लूट सुरू आहे. रुग्णांना चांगल्या सुविधा मिळत नाहीत. यापुढे रूग्णालयाचा अनागोंदी कारभार थांबला नाही तर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.**

**-राजा केणी, जिल्हाप्रमुख, बाळासाहेबांची शिवसेना**

**नवजात बालकांच्या मृत्यची कारणे अनेक आहेत. अनेकदा शेवटच्या टप्प्यात गर्भवती महिला इथे दाखल होतात. अनेकदा परिस्थिती किचकट होते. आमचे डॉक्टर प्रामाणिक प्रयत्न करतात, पण नवजात बालकांच्या मृत्यूचे प्रमाण इतर जिल्ह्यांच्या तुलनेत खूपच कमी आहे. चतुर्थ श्रेणी कर्मचारी हे कंत्राटी आहेत त्यांचा पगार ठेकेदारामार्फत होत असतो. काही डॉक्टर रुग्णांकडून पैसे घेत असल्याच्या तक्रारी आहेत हे गंभीर आहे. त्याविरोधत कारवाई केली जाईल. इतर काही त्रुटी आहेत त्या दूर करण्याचा प्रयत्न केला जाईल.**

**-डॉ. सुहास माने, जिल्हा शल्यचिकित्सक**

## मुरूडमध्ये भटक्या कुत्र्यांची दहशत

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड शहरात अनेक ठिकाणी तसेच समुद्रकिनाऱ्यावर गेल्या अनेक दिवसांपासून भटक्या कुत्र्यांची वाढती दहशत पसरली आहे. याकडे शासनाच्या संबंधित तसेच नगर परिषदेच्या असलेल्या दुर्लक्षाबाबत नाराजी व्यक्त होत आहे. या भटक्या कुत्र्यांचा नगर प योग्य त्या उपाययोजना करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांतून जोर धरीत आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून मुरुड तालुका तसेच समुद्र किनारी सकाळच्या वेळेत भटके कुत्रे टोळक्याने फिरताना दिसतात. त्यामुळे सकाळच्या वेळेत समुद्रकिनारी फिरायला जाणाऱ्या नागरिकांची व पर्यटकांची डोकेदुखी ठरत आहे. यापूर्वीदेखील मुरुडमध्ये श्वानदंशाच्या अनेक घटना घडल्या आहेत. नुकत्याच नांदगावमध्ये तीन जणांना तर मुरूडमध्ये देखील तीन जणांना श्वानदंश झाल्याच्या घटना ताज्या असून, समुद्रकिनारी भटक्या कुत्र्यांची दहशत निर्माण झाली आहे. यासाठी प्राणीमित्र संघटना, विविध सामाजिक संस्थांनी पुढाकार घेऊन तसेच शासनाच्या आरोग्य खात्याने व संबंधित नगरपरिषद व ग्रामपंचायत यांनी यात लक्ष देऊन योग्य ती उपाययोजना करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांतून जोर धरीत आहे.

## विद्यार्थी दिनाचे औचित्य साधून आरोग्य तपासणी

**मुरूड : प्रतिनिधी**

विद्यार्थी दिनाचे औचित्य साधून सोमवारी (दि. ७) लक्ष्मीखार अंगणवाडी क्र. ३३ येथे माता सुरक्षित तर घर सुरक्षित अभियानांतर्गत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. शिबिरास डॉ. निशिगंधा माळी, डॉ. शेखर वानखेडे, एनएएम दक्षता गुरव, एनएएम रेश्मा साळवी, ऋतुजा डांगे, लॅब असिस्टंट रेश्मा कदम, अंगणवाडी सेविका आरती शेडगे, मदतनीस संगीता म्हात्रे, समतादूत वैशाली पेरवे, बालक व माता मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिबिरात एचबी, शुगर टेस्ट, ब्लडटेस्ट व नवजात बालकांना लसीकरण हे करण्यात आले. आरोग्य तपासणीत ६० बालकांचे लसीकरण करण्यात आले.



## कर्जत इनरव्हील क्लब पदाधिकाऱ्यांशी डिस्ट्रिक्ट अध्यक्षांशी साधला संवाद

**कर्जत : प्रतिनिधी**

डिस्ट्रिक्ट ३१३च्या अध्यक्षा मुक्ती पानसे यांची इनरव्हील क्लब ऑफ कर्जतला भेट दिली. या वेळी स्पंदन ई-बुलेटिन चेप्रकाशन करण्यात आले.

रॉयल गार्डनच्या सहभागृहात इनरव्हील क्लबची सर्वसाधारण सभा झाली. मुक्ती पानसे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून सभेला सुरुवात करण्यात आली. अध्यक्ष उत्तरा वैद्य यांनी मुक्ती पानसे यांचे स्वागत केले. मुक्ती पानसे यांनी क्रमाक्रमाने सर्व पदाधिकाऱ्यांची टेक्नॉलॉजी वापरून तयार केलेले रेकॉर्ड पाहून कौतुक केले, तसेच सर्वांनी एकजुटीने मिळून कसे काम करावे याबाबतही मार्गदर्शन केले. संपादक ज्योत्स्ना शिंदे यांनी तयार केलेले स्पंदन ई- बुलेटीन प्रकाशित केले व सर्व सदस्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



या वेळी क्लबचे सर्व पदाधिकारी अध्यक्ष उत्तरा वैद्य, सेक्रेटरी मोनिका बडेकर, खजिनदार अवंतिका गायकर, व्हाईस प्रेसिडेंट वनिता सोनी, ज्योत्स्ना शिंदे, प्राची चौडिये, करुणा पराडकर, शिल्पा दगडे, सदस्या तन्वी जोशी, सरस्वती चौधरी, संजीवनी घुमरे, उज्वला पाटील, शीला गुप्ता, सुलोचना गायकवाड, शितल पाटील, मधुरा मुळे, सुप्रिया गिरी, साक्षी अडसुळे, आरती भोईर उपस्थित होते.

## मुरूड पालिकेतील लिपिकाला पदोन्नती

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड नगरपरिषदेचे नरेंद्र नांदगावकर यांना लिपिक संवर्गातून वरिष्ठ लिपिकपदावर पदोन्नती देण्यात आली.



याबाबतचे पत्र नरेंद्र नांदगावकर यांना मुख्याधिकारी पंकज भुसे यांच्या हस्ते देण्यात आले, तसेच पुष्पगुच्छ देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले.

या वेळी नगरपरिषदेचे प्रशासनिक अधिकारी परेश कुंभार, आरोग्य विभाग अधिकारी राकेश पाटील, लिपिक मनोज पुलेकर, करविभागाचे नंदकुमार आंबेतकर, सुदेश माळी, लेखापाल कपिल वेहेले, बांधकाम विभाग संजय वेटकोळी, प्रकाश आरेकर, अभिजीत कारभारी आदींसह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. नरेंद्र नांदगावकर हे मुरुड नगर परिषदेत विविध पदांवर २८ वर्षे काम करीत असून त्यांची सेवा उल्लेखनीय असल्याने पालिकेच्या वतीने पदोन्नती देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यांच्या पदोन्नतीसाठी त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

## कर्जत, नेरळमध्ये त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त दीपोत्सव

**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ येथील श्री कुसुमेश्वर मंदिर आणि नागेश्वर मंदिरात त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त दीपोत्सव साजरा करण्यात आला. कर्जतमध्ये उल्हास नदीसंवर्धन अभियानाच्या सदस्यांनी पुढाकार घेऊन उल्हास नदीच्या काठावर शेकडो दीप प्रज्वलित करून दीपोत्सव साजरा केला.

नेरळ येथील पेशवेकालीन श्री कुसुमेश्वर मंदिरात भक्तांनी मोठी गर्दी केली होती. मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणात दिवे उजळविण्यात आले.



त्यानंतर सायंकाळी असंख्य भक्तांच्या उपस्थितीत दीपोत्सव साजरा करण्यात आला आणि शेवटी महाआरती घेवून हा सोहळा झाला. नेरळ परिसरातील श्री नागेश्वर मंदिरात देखील दीपोत्सव साजरा करण्यात आला, तसेच उल्हास नदी संवर्धन अभियानाच्या सदस्यांनी उल्हास नदीच्या काठावर शेकडो दीप प्रज्वलित करून दीपोत्सव साजरा केला.

या वेळी समीर सोहनी, विकास चित्ते, मुकुंद भागवत, डॉ. आशुतोष कुळकर्णी, विशाल सुर्वे, महेंद्र कर्वे, माधुरी सुर्वे, लता कुलकर्णी आदीं सह कर्जतकर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वासांबे मोहोपाडा परिसरातील पथदिवे सुरू करण्याची मागणी

**रसायनी : रामप्रहर वृत्त**

वासांबे मोहोपाडा ग्रामपंचायतीतील अनेक पथदिवे काही दिवसांपासून बंद आहेत. यामुळे रात्री चालताना नागरिकांची गैरसोय होत आहे. हे पथदिवे लवकर सुरू करावेत, अशी मागणी नागरिकांमधून जोर धरीत आहे.

वासांबे ग्रामपंचायतीच्या हद्दीत दांड-पेण मुख्य रस्त्यावरील सेबीफाटा ते सेबीपर्यंत एमआयडीसीने पथदिवे लावले आहेत. यातील अनेक पथदिवे काही दिवसापासून बंद आहेत. अनेकदा मागणी करूनही हे पथदिवे सुरू करण्यात आले नाहीत. मुख्य रस्त्यावरील सेबीफाटा ते सेबी केंद्रापर्यंतच्या चौपदरी रस्त्यावरील दुभाजकावर एमआयडीसीने पथदिवे लावले आहेत. अनेक पथदिवे बंद असल्याने रात्री रस्त्यावरून सेबी कॉलनी, शिवनगर आदिवासीवाडी, पानशिल, तळेगाव, तळेगाववाडी आदी ठिकाणी जाणाऱ्या नागरिकांची गैरसोय होत आहे. सध्या थंडी पडत असल्याने पहाटे या रस्त्यावरून परिसरातील फेरफटका मारणाऱ्या नागरिकांची संख्या मोठी आहे, पण पहाटेला अंधार असतो. त्यामुळे पथदिवे सुरू करण्याची मागणी आहे.

# कर्जत तालुक्यात त्रिपुरारी पौर्णिमा उत्साहात

## डोलकाठीचे भाविकांना आकर्षण

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील किरवली, हालिवली, वांजळे आदी गावांमध्ये त्रिपुरारी पौर्णिमा यात्रा स्वरूपात साजरी करण्यात येते. किरवली येथील ग्रामदैवत श्री भैरवनाथाची यात्रा उत्साहात पार पडली. किरवली-देऊळवाडी येथे देवाची ढोलकाठी नाचविली जाते. यंदा तरुण ग्रामस्थांनी ही डोलकाठी हनुवटीवर, दातांवर, कपाळावर, हातावर ठेऊन नाचविली. नवसाला पावणाऱ्या या दैवताचे दर्शन भाविकांनी मोठ्या संख्येने घेतले.

श्री भैरवनाथाची यात्रा पहाटे साडेचार वाजता काकड आरतीने सुरू झाली. त्यानंतर परिसरातील श्रीपती बाबा प्रासादिक भजन मंडळाचे संगीत भजन झाले. परंपरेनुसार या डोलकाठीच्या टोकाला ढाक-भैरी मंदिरातून ट्रस्टचे सचिव दिलीप बडेकर यांच्या नेतृत्वाखाली आणलेला गरुडध्वज आणला आणि काठीच्या तुऱ्यावर बांधला. या डोलकाठीची पूजा ट्रस्टचे अध्यक्ष किसन जैतु बडेकर यांच्या हस्ते करण्यात आली. त्यानंतर डोलकाठीचा मोर पिसाऱ्याने शिवमंदिरातील शिवपिंडीला आरतीच्या वेळी वारा घालून ही ३० फुट उंचीची वजनी डोलकाठी हनुवटीवर, दातांवर, कपाळावर व हातावर ठेऊन बिपीन बडेकर, शत्रुघ्न बडेकर, मनेष बडेकर, प्रकाश तथा पप्पू बडेकर, विकास बडेकर, चिराग बडेकर, सुरेश बडेकर, सौरभ बडेकर, अरविंद बडेकर, जयवंत बडेकर, देविदास बडेकर, शैलेश बडेकर आदींनी नाचवित नेली.

डोलकाठी नाचवीत नाचवीत देऊळवाडी,पुलाचीवाडी, बोरवाडी, किरवली येथे नेण्यात आली. त्या पाठोपाठ श्री भैरवनाथाची पालखी निवृत्तीबुवा शिंदे यांच्या नेतृत्वाखाली भजनी संगीतासह मिरवणुकीने नेण्यात आली. यंदा मिरवणुकीत नाचणारा घोडा असल्याने चिमुकल्यांनी करमणूक होत होती. प्रत्येक घरी पालखीत असलेल्या अश्वारूढ श्री भैरवनाथाच्या मूर्तीची मनोभावी आरती व पूजा करण्यात आली. दिवेलागणीच्या सुमारास सुवासिनींनी उकडलेल्या पिठाचे दिवे सुपातून उडविले.

श्री भैरवनाथाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांची गर्दी होती. या वेळी सावळाराम बडेकर, रत्नाकर बडेकर, पुंडलिक बडेकर, प्रकाश बडेकर, शरद बडेकर, हनुमंत गायकर, पंढरीनाथ खांगटे, अनिल बडेकर, संजय बडेकर आदी उपस्थित होते.



फौ. चौ. अर्ज नं. २५३/२०२२
नि. नं

**कर्जत येथील मे.ज्युडिशीयल मॅजीस्ट्रेट प्रथम वर्ग यांच्या कोर्टात**

**श्री.जगदिश वसंत मोडक,**
वय - ४५ वर्षे, धंदा- व्यवसाय,
रा. हेटकरी आळी, गणपती मंदीरा जवळ,
नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड-४१०१०१. } अर्जदार

**विरूध्द**

**मा. ग्रामविकास अधिकारी सो,**
ग्रुप ग्रामपंचायत नेरळ,
पत्ता. जिजामाता तलाव जवळ,
नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड-४१०१०१. } सामनेवाला

तमाम लोकांस या जाहिर नोटीस द्वारे कळविण्यात येते की, अर्जदाराचे वडील कै. हरी गणु मोडक हे दिनांक ०१/०६/१९६५ रोजी आजारपणाने मौजे नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड येथे मयत झालेले आहे. परंतू ग्रामपंचायत नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड यांचे जन्म मृत्यू नोंदणी रजिस्ट्रर मध्ये त्यांचे मृत्यूची नोंद करण्याचे राहून गेलेले आहे. त्याकामी अर्जदाराने या मा. न्यायालयाकडे सदरची मृत्यूची नोंद सामनेवाल्याच्या दप्तरी नोंद घालण्यासाठी मे. न्यायालयाकडे अर्ज दाखल केलेला आहे. याबाबत कोणाचीही कोणतीही हरकत असल्यास आपण पुराव्यासह ३० दिवसाच्या आत या न्यायालयात कळवाव्यात जर कोणतीही हरकत आली नाही तर वरील अर्जदारांच्या लाभात मे. न्यायालय मृत्यूची नोंद होण्याचे आदेश सामनेवाला यांना देतील. याची नोंद घेण्यात यावी.

आज दिनांक ८/११/२०२२ रोजी आमच्या सही शिक्क्यानिशी दिली

सही/-
श्री श्रीम. ..........
कनिष्ठ लिपिक
दिवाणी न्यायालय कर्जत

शिक्का

सही/-
सौ...........
सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय कर्जत

**ॲड. नरेश रामदास आहीर.**
**पत्ता - शॉप न. १२, शिवगंगा अपार्टमेंन्ट, ब्राम्हणआळी, नेरळ ता. कर्जत, जि. रायगड मो. - ९३२५०६००३७.**

# नवी मुंबईतील सार्वजनिक वाहतुकीचे कौतुक

## प्रथम पुरस्काराने शहराचा गौरव



**नवी मुंबई : बातमीदार**

भारत सरकारच्या गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालयाच्या अखत्यारितील इन्स्टिट्युट ऑफ आरबन ट्रान्सपोर्ट (इंडिया) यांचेमार्फत कोची येथे झालेल्या १५ व्या अर्बन मोबॅलिटी इंडिया परिषदेत नवी मुंबई महापालिका परिवहन उपक्रमास 'सर्वोत्तम सार्वजनिक वाहतूक व्यवस्था असलेले शहर ' श्रेणीचा राष्ट्रीय प्रथम पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

केरळचे राज्यपाल आरिफ मोहम्मद खान आणि केंद्रीय गृहनिर्माण आणि शहरी विकास राज्यमंत्री ना. कौशल किशोर यांचे हस्ते नवी मुंबई महापालिका परिवहन उपक्रमाच्या वतीने हा राष्ट्रीय गौरवाचा पुरस्कार परिवहन व्यवस्थापक योगेश कडुसकर यांनी कार्यकारी अभियंता यांत्रिकी विवेक अचलकर, मुख्य वाहतूक अधिकारी अनिल शिंदे, तुर्भे आगार व्यवस्थापक सुनील जगताप यांच्यासोबत स्विकारला.

महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी या राष्ट्रीय मानाच्या पुरस्काराबद्दल एनएमएमटीच्या सर्व अधिकारी, कर्मचारीवृंदाचे कौतुक करीत या पुरस्कारामध्ये प्रवासी नागरिकांनी उपक्रमावर दाखविलेल्या विश्वासदर्शक सहकार्याचा मोठा वाटा असल्याचे मत व्यक्त केले आहे.

भारत सरकारच्या गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालयामार्फत प्रत्येक वर्षी शहरे, मेट्रो कंपन्यांच्या कामगिरीवर आधारित, शहरी वाहतूक आणि सर्वोत्तम प्रकल्पांच्या विविध १२ श्रेणींमध्ये उत्कृष्ट कामगिरीसाठी पुरस्कार प्रदान करण्यात येतात. या अनुषंगाने सर्व राज्ये, मेट्रो, रेल्वे, वाहतूक उपक्रम इत्यादींकडून विहित नमुन्यात पुरस्कार प्रवेशिका मागविण्यात आल्या होत्या. त्यामध्ये नवी मुंबई महापालिका परिवहन उपक्रमाकडून सर्वोत्तम सार्वजनिक वाहतूक व्यवस्था असलेले शहर या श्रेणीत नामांकन नोंदविण्यात आले होते.

नवी मुंबई महापालिका परिवहन उपक्रमाकडून करण्यात येत असलेल्या बस संचलनात पर्यावरणपूरक इंधनावर चालणाऱ्या बसेसचा जास्तीत जास्त वापर, शनिवार, रविवार आणि सार्वजनिक सुटीच्या दिवशी १०० टक्के पर्यावरणपूरक बसेसचे प्रवर्तन, मागील सहा महिन्यांच्या कालावधीत चार पटीने वाढलेली कॅशलेस तिकीट विक्री, प्रवाशी जनतेस सक्षम व सुलभ पद्धतीने प्रवाशी सेवा देण्यासाठी आय.टी.एम.एस. प्रणालीचा पुरेपूर वापर, परिपूर्ण प्रशिक्षित चालकांकडून ई बस चालवून ई बसेसचे परिचलन सुव्यवस्थितपणे करणे, मागील कालावधीतील प्रति कि.मी.मध्ये झालेली वाढ व त्या तुलनेने दैनंदिन बस संचलनातील प्रति कि.मी खर्चात झालेली घट, बाह्यउत्पन्न वाढीसाठी करण्यात आलेले नियोजन व वाणिज्य प्रकल्पांचा विकास. अशा विविध बाबीं विचारात घेऊन सर्वोत्तम सार्वजनिक वाहतूक व्यवस्था असलेले शहर (सिटी विथ द बेस्ट पब्लिक स्ट्रान्सपोर्ट सिस्टीम) या प्रकल्पास पुढील फेरीसाठी पात्र करण्यात आल्याने २० ऑक्टोबर २०२२ रोजी नवी दिल्ली येथे प्रकल्पाचे सादरीकरण करण्यात आले होते.

हा पुरस्कार महापालिका आयुक्त तथा प्रशासक राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शन तसेच नवी मुंबई महापालिका परिवहन उपक्रमात कार्यरत सर्व संवर्गातील अधिकारी व कर्मचारी यांचे अथक परिश्रम, परिवहन उपक्रमात कार्यरत कंत्राटदार व त्यांचे कर्मचारी आणि परिवहन उपक्रमाच्या कार्यक्षेत्रातील प्रवाशी जनतेच्या सहकार्याने प्राप्त झाला असल्याचे मत परिवहन उपक्रमामार्फत व्यक्त करण्यात आले आहे.

### नवी दिल्लीतील यशस्वी सादरीकरणानंतर सन्मान

भारत सरकाच्या गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालयाच्या अखत्यारित स्थापन करण्यात आलेल्या इन्स्टिट्युट ऑफ अर्बन ट्रान्सपोर्ट (इंडिया) यांच्यामार्फत ४ ते ६ नोव्हेंबर २०२२ या कालावधीत फिफ्टीन्थ अर्बन मोबिलीटी इंडिया कॉन्फरन्स कम एक्झिबिशन २०२२चे आयोजन बोलगट्टी कोची येथे करण्यात आले होते. या कॉन्फरन्समध्ये नवी दिल्ली येथे करण्यात आलेल्या यशस्वी सादरीकरणानंतर नवी मुंबई महापालिका परिवहन उपक्रमास 'सर्वोत्तम सार्वजनिक वाहतूक व्यवस्था असलेले शहर' या श्रेणीचा राष्ट्रीय प्रथम पुरस्कार देवून गौरविण्यात आले.

# लोना कंपनीसमोर अधिकाऱ्यांचे उपोषण




**रसायनी : प्रतिनिधी**

लाडीवली येथील लोना कंपनीसमोर लाडीवली येथील लोनामध्ये काम करणारे ऑफीसर हे त्यांच्या मागण्यांसाठी उपोषणाला नुकतेच बसले आहेत. यामध्ये नयन वसंत गोळे, सुरेश भाऊ शिगवण, मनोहर गणेश शिर्के, सागर सदाशिव कालेकर, तुषार गोविंद कालेकर हे आहेत.

उपोषणाला बसलेले हे सर्व लोनामध्ये काम करीत असून त्यातील दोघे कायम झालेले आहेत. समान पगार मिळाला पाहिजे, आमचे पगार हे वाढवले पाहिजेत, आमचे प्रोबशन पिरियड जास्तीत आहे व ट्रेनिंग पिरियड जास्तच आहे तो कमी करा, अशा मागण्या या अधिकाऱ्यांनी केल्यात. कंपनी व्यवस्थापनाला लाडीवली ग्रामस्थांनी मदत केली आहे, असेही त्यांचे म्हणणे आहे.

या संदर्भात कंपनी व्यवस्थापनाकडून असे सांगण्यात आले आहे की, आम्ही कोणावरही अन्याय केलेला नाही. उपोषणाला बसलेले दोन नयन वसंत गोळे व सुरेश भाऊ शिगवण यांनी कंपनीच्या ऑफीसर असलेले प्रभाकर दळवी यांना मारहाण केली आहे व कंपनीत दहशतीचे वातावरण निर्माण झाले. कंपनीत समान वेतन हा कायदा मान्य होत नाही. येथे कामाचा अनुभव लक्षात घेतला जातो. कंपनीच्या स्टाफमध्ये असलेले युनियन करू शकत नाही हा नियम आहे. जे कंपनीच्या कामाची शिस्त व नियमानुसार वागत नाहीत व कंपनीचे चांगले वातावरण खराब करतील व वरीष्ठ अधिकारी याचे काम व नियम पाळत नाहीत त्यांना कंपनीच्या नियमानुसार शिक्षाही होणार. कंपनीमध्ये जागतिक मंदीचे सावट आहे. यामुळे कंपनी संकटातून जात आहे, असे असताना हे लोक जाणूनबुजून कंपनीचे नाव खराब करीत आहेत, असे म्हणत व्यवस्थापनाने त्याचे आरोप फेटाळले आहेत.

दरम्यान, उपोषणकर्ते व कंपनी व्यवस्थापनाची मंगळवारी (दि. ८) उशीरापर्यंत बैठक सुरू होती.

# अमली पदार्थ बाळगणाऱ्या नायझेरियन नागरिकाला अटक

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

अमली पदार्थ विक्री वितरण आणि सेवन यामध्ये अनेकदा नायझेरियन नागरिकांचा सहभाग समोर आला आहे. नवी मुंबईतही नुकत्याच झालेल्या एका मोठ्या कारवाईत १० लाख ३० हजार रुपयांचे एम डी (मेथाक्युलॉन हस) हा अमली पदार्थ जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी एका नायझेरियन नागरिकाला अटक करण्यात आली आहे.

नवी मुंबईतील वाशी विभागातील जुहुगाव परिसरात ४ नोव्हेंबर रोजी नायजेरियन नागरिक अमली पदार्थांची विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती अंमली पदार्थ विरोधी विभागाला मिळाली होती. त्यानुसार पोलिसांच्या पथकाने वाशी जुहूगाव परिसरात सापळा रचला होता. आरोपी किनीची न्वॉनी ओबोंना (वय ४२) या नायजेरियन नागरिकाला ताब्यात घेतले होते. त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याकडे मेथाक्युलॉन हस (एमडी) नावाचा प्रतिबंधित अमली पदार्थाचा साठा आढळून आला. १३० ग्रॅम वजनाचा १० लाख ३० हजार रुपयांच्या या अमली पदार्थासह एक मोबाइल फोन आणि स्कुटीही पोलिसांनी जप्त केली आहे. वाशी पोलीस ठाण्यात अधिक तपास सुरू आहे.

# पाणी समस्या लवकरच मार्गी

**खारघर : रामप्रहर वृत्त**

सिडकोच्या पाणीपुरवठा विभागातील उप अभियंत्याने खारघर सेक्टर ११ परिसरातील कमी दाबाने पाणीपुरवठा होणाऱ्या गृहनिर्माण सोसायटीतील सदस्यांची भेट घेऊन पाणी समस्येची माहिती घेतली. या वेळी लवकरात लवकर पाणीप्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

खारघर सेक्टर अकरामधील स्नेहा, अनुसया आचार्य, संकेश्वर, वैभवशाली, महालक्ष्मी, गुडविल बालाजी या गृहनिर्माण सोसायटीत कमी दाबाने पाणी पुरवठा होत असल्याची समस्या रहिवाशांनी माजी नगरसेवक प्रवीण पाटील यांच्याकडे मांडली होती. त्यानुसार सिडकोच्या पाणीपुरवठा विभागाशी संपर्क साधून या सोसायटीला भेट देऊन रहिवाशांची पाणी समस्या मार्गी लावण्यास सांगितले होते. सरोदे यांनी सर्व सोसायट्यांना भेट देऊन दैनंदिन होणाऱ्या पाणीपुरवठा, तसेच जलवाहिनी पाहणी केली. तसेच सोसायटीत किती युनिट पाणीपुरवठा होतो याची नोंद घेण्यास सांगितले. यावेळी सिडको अधिकाऱ्यांनी पाणीप्रश्न सोडवला जाईल, असे आश्वासन दिले आहे.

# उरण नौदलातील अधिकारी बेपत्ता

**उरण : वार्ताहर, प्रतिनिधी**

उरण करंजा-उरण नौदल शस्त्रागारातील आयएनए. अभिमन्यूमध्ये काम करणारा २२ वर्षीय नौदल अधिकारी विशाल महेश कुमार ३ नोव्हेंबरपासून अचानक बेपत्ता झाला आहे. त्याचा शोध घेण्यात पोलीस, नौदल विभागाच्या अधिकाऱ्यांकडून दिरंगाई होत असल्याने जैसा कैसा ही हो, मेरा लाल मुझे वापस लौटा दो,' अशी आर्त साद त्याच्या मातेने पोलीस आणि नौदलाला घातली आहे.



उत्तर प्रदेशातील धपरौली येथील विशाल महेश कुमार (वय २२) दीड वर्षापूर्वी उरण-करंजा येथील नौदलाच्या सेवेत दाखल झाला होता. महेश कुमारची आई मधू व वडील महेशकुमार यांनी आपल्या दुसऱ्या लहान मुलांसह मुंबई गाठण्यासाठी विमानाची तिकिटे काढली होती, मात्र विमानतळावर वेळेवर पोहचता न आल्याने विमान सुटले. त्यामुळे त्यांनी बागपत ते उरण हे ३५०० किमी ३६ तासांचे अंतर खासगी भाड्याच्या कारने पूर्ण केले.

आईवडिलांनी नौदल अधिकाऱ्यांच्या मदतीने उरण पोलीस ठाण्यात ६ नोव्हेंबरला विशाल बेपत्ता झाल्याची तक्रार दिली, मात्र, नौदल व पोलीस विशालचा शोध घेण्यात दिरंगाई करीत असल्याचा आरोप आईवडिलांनी केला आहे.

विशाल ३ नोव्हेंबरला सकाळी १०:०२ ते १०:५६ वाजेपर्यंत उरण नगर परिषदेच्या तरणतलावात पोहण्यासाठी गेला असल्याचे तेथील सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसून आले आहे, मात्र रजिस्टरमध्ये कोणत्याही नोंदी नाहीत. तसेच ३ नोव्हेंबरला दुपारी १ वाजताचे विशालचे शेवटचे मोबाइल लोकेशन पनवेल रेल्वे स्टेशन दिसत आहे. आईवडिलांचे म्हणणे आहे. दिरंगाई केल्यास पोलीस ठाण्यासमोरच कुटुंबीयांसह आत्मदहनाचा इशाराही आईवडिलांनी दिला आहे.

# मंगेश गायकवाड यांची निवड

**नवी मुंबई :** माणगाव तालुक्यातील देवळी या गावचे सुपुत्र तसेच सीवूड्स दारावे येथे राहणारे



सामाजिक कार्यकर्ते मंगेश रामदास गायकवाड हे बॉम्बे हॉस्पिटल कामगार सहकारी पतसंस्थेच्या संचालक मंडळावर निवडून आहे आहेत. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहेत.

गायकवाड हे देवळी गावच्या प्रबुध्द विकास मंडळ, मुंबईचे विद्यमान अध्यक्ष आहेत. तसेच अनेक सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील संस्थेत ते सहभागी असून पदाधिकाऱ्यांची धुरा वाहताहेत. बॉम्बे हॉस्पिटलमध्ये ते दिर्घकालीन सेवेत असून तेथे त्यांची सेवातत्परता सर्वमान्य आहे. तसेच चांगला निडर कामगार नेता म्हणूनही ते प्रसिध्द आहेत.

# पावसामुळे टोमॅटोच्या दरात घसरण, तर डाळिंबाचे दर भिडले गगनाला

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

राज्यात विविध ठिकाणी परतीच्या पावसाने हजेरी लावल्याने मोठ्या प्रमाणावर टोमॅटो पिकांचे नुकसान झाले होते. यामुळे एपीएमसीत टोमॅटो ४० रुपये किलो, तर किरकोळाला ५० ते ५५ रुपये किलोपर्यंत दरवाढ झाली होती. मात्र, दिवाळीनंतर हे दर किलोमागे २५ रुपयांनी घसरले असून किरकोळ बाजारात ३० रुपये किलोने टोमॅटोची विक्री होत आहे.

अतिवृष्टीमुळे टोमॅटो नाशिक, सातारा, सांगली आणि पुणे जिल्ह्यात शेतकऱ्यांनी टोमॅटोची केलेली लागवड पाण्याखाली गेली होती. हाती आलेले पीक डोळ्यांदेखत सडू लागले होते.



यामुळे मुंबई एपीएमसीला होणारी टोमॅटोची आवक कमी झाली होती. एपीएमसीच्या घाऊक बाजारात नेहमी ७० ते ८० गाड्या टोमॅटोची आवक होत होती. ती आवक ३० ते ३५ गाड्यांवर आली होती. एपीएमसीमधूनच मुंबई आणि उपनगरांतील किरकोळ व्यापारी टोमॅटो खरेदी करतात. मात्र, बाजारातील आवक घटल्याने किरकोळ बाजारात टोमॅटोचा तुटवडा भासू लागल्याने ऑक्टोबर महिन्यात टोमॅटोच्या दरात तेजी आली होती. यामुळे एपीएमसी घाऊक बाजारात ३५ ते ४० रुपये, तर किरकोळ बाजारात उत्तम प्रतीचा टोमॅटोला ६० ते ६५ आणि दुय्यम प्रतीचा टोमॅटो ५० ते ५५ रुपये ग्राहकांना मोजावे लागत होते.

दिवाळी होताच टोमॅटोची आवक वाढली असून बाजारातील दरही निम्म्यावर आले. एपीएमसीत १८ ते २२, तर किरकोळात ३० रुपये किलोने टोमॅटोची विक्री केली जात आहे. आवक वाढल्यानंतर टोमॅटोचे दर आणखी खाली येतील, अशी शक्यता वर्तवली जात आहे.

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

मुंबई कृषी उत्पन्न फळ बाजारात जुलै अखेर डाळिंब, सीताफळ यांची आवक सुरू होत असते; तर ऑगस्ट महिन्यात या फळाची आवक वाढण्यास सुरुवात होते; परंतु अवकाळी पावसाने हंगामाला एक महिना लांबणीवर गेला आहे. डाळिंब उत्पादनाला फटका बसल्याने दराने उच्चांक गाठला असून प्रतिकिलो कमीत कमी ८० रुपये ते चांगल्या प्रतीच्या डाळिंबाची अडीचशे रुपयांनी विक्री होत आहे.



सध्या एपीएमसी बाजारात राज्यातील सांगोला, सोलापूर नगर, फलटण, जेजुरी येथून डाळिंब दाखल होत आहेत. यंदा पाऊस लांबल्याने, पडलेल्या अवकाळी पावसाने डाळिंबाच्या बागांना फटका बसला आहे. दरवर्षी ऑक्टोबर-सप्टेंबरमध्ये २० गाडी आवक होत असते; परंतु आता केवळ ६ ते ८ गाड्या दाखल होत आहेत. यंदा पावसामुळे डाळिंबाच्या हंगामाला एक महिना उशिरा सुरुवात होत आहे. त्यातही डाळिंबाला तेली रोगाचा प्रादुर्भाव होत असल्याने डागाळलेले डाळिंब बाजारात दाखल होत आहेत. त्यामुळे घाऊक बाजारात डाळिंब आवक घटली असून परिणामी किरकोळ बाजारात तुरळक असून कमीत कमी १५० ते ३०० रुपयांनी विक्री होत आहे.

# एकाहून अधिक भाषा येणे हे भारतीयांचे वैशिष्ट्य -दळवी



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

मराठी व उर्दू या माझ्या दोन्ही मातृभाषा असल्याचे मी विविध मुलाखतींतून अभिमानाने सांगतो. एकाहून अधिक भाषा येणे हे आपल्या भारतीयांचे वैशिष्ट्य आहे. कोणतीही बोली-भाषा ही छोटी नसते आणि भाषा कुणाची मक्तेदारीही नसते असे ठाम प्रतिपादन मुंबई विद्यापीठाचे उर्दू भाषा माजी विभाग प्रमुख प्रा. अब्दुस सत्तार दळवी यांनी वाशी येथे केले.

वाशी येथील गुरव ज्ञाति सभागृहात रविवारी (दि. ६) प्रा. दळवी यांच्या हस्ते तळोजा येथील साहित्यिक इकबाल शर्फ मुकादमलिखित 'धागा' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन करताना ते बोलत होते. या वेळी विचारमंचावर सार्वजनिक वाचनालय कल्याणचे कार्यवाह भिकू बारस्कर, साहित्यप्रेमी सुधीर कदम, कोमसाप-खेडचे कार्यकारिणी सदस्य रौफ खतीफ, 'आपलं नवे शहर'चे उपसंपादक राजेंद्र घरत उपस्थित होते.

भावना, वेदना ह्यांना भाषेची बंधने नसतात. जाति-धर्माच्या भिंती ओलांडून त्यांचे आवाहन सर्वांनाच होत असते असे सांगून राजेंद्र घरत म्हणाले की, साहित्य हे हिंदू, मुस्लिन, ख्रिश्चन वगैरे नसते. ते निव्वळ साहित्य असते. त्याची भाषा भले वेगवेगळी असेल, मात्र आपण रसिक वाचकांनी चांगल्या साहित्याला दाद द्यायला हवी, ते उत्तम झाले आहे हे त्या त्या साहित्यिकाला आवर्जून कळवायला हवे अशी सूचना घरत यांनी यावेळी केली व 'धागा' या पुस्तकातील भाषा ओघवती, प्रवाही, संवादी असल्याचे मत मांडले.

या वेळी भिकू बारस्कर, सुधीर कदम, रौफ खतीफ यांनीही आपल्या भाषणांतून मुकादम यांच्या कवितासंग्रहास शुभेच्छा देत त्यांची अनेक पुस्तके येवोत असे विचार मांडले. या कार्यक्रमाचा प्रारंभ राष्ट्रगीताने करण्यात आला. 'धागा'मधील कवितानुरुप विविध वेधक रेखाचित्रे काढणाऱ्या गणेश म्हात्रे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. प्रतीक्षा बोर्डे यांनी नेटके सूत्रसंचालन केले, तर इकबाल मुकादम यांची कन्या निशात मुकादम हिने आभार मानले.

# भष्ट्राचार निर्मूलनासाठी केबीपी कॉलेजकडून जनजागृती

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमधील (केबीपी) राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी भष्ट्राचार प्रतिबंधात्मक सप्ताहाच्या निमिताने ३१ ऑक्टोबर ते ६ नोव्हेंबर या कालावधीत पथनाट्यातून जनजागृती केली.



भ्रष्टाचार प्रतिबंधात्मक सप्ताह दरम्यान स्वयंसेवकांनी संपूर्ण नवी मुंबई परिसरातील विविध ठिकाणी भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी पथनाट्याच्या माध्यमातून जनजागृती करत समाजाला भ्रष्टाचारमुक्त भारत घडवण्याचा संदेश दिला आणि भ्रष्टाचारमुक्त भारत घडवण्यासाठी शपथ घेतली. हे पथनाट्य जुहूगाव, वाशी, पनवेल, ऐरोली, ठाणे व सिवूड-बेलापूर इत्यादी ठिकाणी सादर करण्यात आले. या प्रसंगी लाचलुचपत प्रतिबंधक विभागातील वरिष्ठ पोलीस निरीक्षक ज्योती देशमुख आणि अंजली विशे यांनी देखील स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. या पथनाट्याच्या आयोजनात एकूण ५० स्वयंसेवक सहभागी होते.

राष्ट्रीय सेवा योजना विभाग मागील १० वर्षांपासून लाचलुचपत प्रतिबंधक विभागासोबत पथनाट्याच्या माध्यमातून विविध ठिकाणी जनजागृती करत आहे. या उपक्रमाचे नियोजन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शुभदा नायक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रकल्प अधिकारी डॉ. लक्ष्मण गवळी, प्रा. प्रणिता भाले, प्रा. निलेश नलावडे यांनी परिश्रम घेतले.

# तुळशी विवाहासाठी उरण बाजरपेठेत साहित्य विक्री

**उरण : वार्ताहर**

तुळशी विवाहाचा मंगळवारी (दि. ८) शेवटचा दिवस असल्याने पूजेसाठी समान खरेदी करण्यासाठी महिलांची लगबग सुरू होती, असे चित्र उरण बाजार पेठेत पहावयास मिळत होते. उस २० रुपये, बोरे चिंच आवळे वाट १० रुपये, करंडा फनी १० रुपये, खायची पाने १० रुपयास १० नग, केळी ४० ते ५० रुपये डझन अशा दराने विकल्या जात होत्या.

उरणमध्ये महाराष्ट्र स्वीट जवळ, राजपाल नाका, गांधी चौक येथे पूजेच्या सामुग्रीची दुकाने थाटण्यात आली होती. तुळशी विवाह एक पौराणिक आणि धार्मिक परंपरा आहे. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात साजरी करण्यात येते. कोरोना महामारीच्या नंतर दोन वर्षांनी उरणात आता मोठ्या उत्साहात तुळशी विवाह साजरे करण्यात येत आहेत. काही ठिकाणी एकादशीच्या निमित्ताने



तुळशी विवाह साजरे झाले तर बहुतांश ठिकाणी ५ ते ८ नोव्हेंबर या कालावधीत साजरे करण्याचा मुहूर्त आहे. रायगडातील सर्व तालुक्यात तुळशी विवाह साजरा केला जातो.

कोरोना महामारीच्या काळातही साधेपणाने तुळशीचे लग्न लावण्यात आलेले होते, मात्र यंदा जल्लोषात नेहमीची परंपरा अमलात आणण्यात आहे. तुळशीच्या झाडाचे लावण्याचा उत्साह असल्याचे उरण येथील यशवंत पाटील यांनी सांगितले. अन्य लग्नांप्रमाणेच तुळशिच्या लग्नातही महिलांचा उत्साह ओसंडून वाहात असतो.

# डम्पिंग ग्राऊंडवरील कचरा रस्त्यावर

## पालीतील नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

पाली शहरातील कित्येक टन कचरा येथील टेंबी वसाहतीजवळील डम्पिंग ग्राऊंडमध्ये टाकला जातो, मात्र येथे संरक्षक भिंत नसल्याने हा कचरा मुख्य रस्त्यावर येत असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. त्यामुळे नगरपचायतीने या ठिकाणी संरक्षक भिंत बांधावी अशी मागणी नागरिकांमधून जोर धरीत आहे.

डम्पिंग ग्राऊंडच्या आजूबाजूला शिक्षक व इतर वसाहती आहेत. आयटीआय व विद्युत महावितरण सबस्टेशन आहे. शिवाय गृहसंकुल इमारतीसुद्धा आहेत. मढाळी व शिळोशी गावांना जाण्याचा हा मुख्य रस्ता आहे. डम्पिंग ग्राऊंडला संरक्षक भिंत नसल्याने कचरा रस्त्यावर आला आहे. घाण व दुर्गंधीमुळे येथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. फेब्रुवारी महिन्यात पाली ग्रामपंचायतीची नगरपंचायत झाली, मात्र अजूनही घनकचरा व्यवस्थापनचा प्रश्न अद्यापही सुटलेला नाही.



संरक्षक भिंत नसल्याने मोकाट गुरे, कुत्रे तेथे येऊन प्लास्टिकमधील अन्नपदार्थ कचऱ्यासह खातात, त्यामुळे त्यांचे आरोग्यही धोक्यात येत असून अनेक जनावरेदेखील दगावली आहेत. येथील कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी कोणतीच शास्त्रीय पद्धत वापरली जात नाही. हा कचरा थेट जाळला जातो. यामुळे मोठ्या प्रमाणात वायू प्रदूषण होत आहे. याबाबत त्वरीत उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

### सिद्धेश्वर ग्रामपंचायतीचा आदर्श घ्यावा

प्लास्टिकचा पुनर्वापर व प्रक्रिया व्हावी यासाठी सुधागड तालुक्यातील सिद्धेश्वर ग्रामपंचायतीने पुढाकार घेतला आहे. यासाठी ५आर मुंबई, रायगड जिल्हा परिषद, सुकन्या संघ, शाळा, स्वदेस समिती व प्राईड इंडिया यांच्या सहाय्याने जिल्ह्यातील पहिला पथदर्शी प्रकल्प राबवत आहे. त्यामुळे या ग्रामपंचायतीचा आदर्श पाली नगरपंचायतीनेही घेऊन प्लास्टिकचे पुनर्वापर करणे गरजेचे आहे, असे मत नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

**नगरपंचायत कर्मचारी कचरा डम्पिंग ग्राऊंडमध्ये न टाकता रस्त्याच्या बाजूला टाकतात. हा कचरा रस्त्यावर आल्याने दुर्गंधी व घाणीमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. पाली नगरपंचायतीने या डम्पिंग ग्राऊंडला संरक्षण भिंत घालावी जेणेकरून जनावरे आत जाणार नाहीत आणि कचरासुद्धा बाहेर येणार नाही.**

**–कपिल पाटील, सामाजिक कार्यकर्ते, पाली**

**डम्पिंग ग्राऊंड व त्या बाहेर येणाऱ्या कचऱ्यासंदर्भात लवकरच योग्य उपयोजना करण्यात येईल. याबाबत कर्मचाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत. नागरिकांना कोणत्याही प्रकारे त्रास होणार नाही याची खबरदारी आम्ही घेत आहोत.**

**–आरिफ मणियार, उपनगराध्यक्ष, पाली**

## फिट इंडिया मोहिमेंतर्गत प्रश्नमंजुषा स्पर्धा

शाळा, महाविद्यालयांनी नोंदणी करण्याचे आवाहन

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

आयुक्त, शिक्षण व क्रीडा यांनी दिलेल्या निर्देशानुसार फिट इंडिया प्रश्नमंजुषा २०२२ या स्पर्धेमध्ये जिल्ह्यातील जास्तीत जास्त शाळा, महाविद्यालयांनी ऑनलाइन नोंदणी करून सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर आणि जिल्हा क्रीडा अधिकारी रविंद्र नाईक यांनी केले आहे.

या स्पर्धेकरिता नोंदणी करण्याची मुदत दि. १५ नोव्हेंबरपर्यंत वाढविण्यात आली आहे. इच्छुकांनी http://fitindia.nta.ac.in या लिंकद्वारे ऑनलाइन नोंदणी करावी. स्पर्धेमध्ये जिल्ह्यातील जास्तीत जास्त शाळा, महाविद्यालयांनी सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे.

## खोटी कागदपत्रे देऊन स्टेट बँकेची ८३ लाखांची फसवणूक

**अलिबाग : प्रतिनिधी**

बनावट कागदपत्रांच्या आधारे वैयक्तिक कर्ज घेऊन स्टेट बँक ऑफ इंडियाच्या श्रीबाग शाखेत २८ भामट्यांनी ८३ लाख १९ हजार ४२७ रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याबाबत अलिबाग पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बँकेच्या व्यवस्थापकावर निलंबनाची कारवाई प्रशासनाने केली आहे.

स्टेट बँकेच्या श्रीबाग शाखेतील अधिकाऱ्यांना कागदपत्रांच्या पडताळणीकडे दुर्लक्ष करणे चांगलेच महागात पडले आहे. या शाखेत २८ जणांनी वैयक्तिक कर्जासाठी अर्ज केला होता. हे सर्व विविध ठिकाणी काम करीत असून कर्जासाठी लागणारी बनावट कागदपत्रे त्यांनी बँकेकडे सादर केली होती. १ मार्च २०१८ ते १ सप्टेंबर २०२२ यादरम्यान कर्ज घेतले होते. कागदपत्रांची योग्य ती पूर्तता करण्याची जबाबदारी शाखा व्यवस्थापकांची होती, मात्र ती न करता २८ जणांना त्यांनी ८३ लाख १९ हजार ४२७ रुपये कर्ज वितरीत केले होते.

कर्जदारांनी कर्जाचा हप्ता न भरल्याने वरिष्ठ पातळीवर याबाबत चौकशी करण्यात आली. या वेळी २८ कर्जदारांनी बनावट कागदपत्रे देऊन बँकेची फसवणूक केल्याचे समोर आले. याबाबत अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## लोधिवलीत आढळला महिलेचा मृतदेह

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

वासांबे मोहोपाडा जिल्हा परिषद विभागातील लोधिवली येथे एका महिलेचा मृतदेह आढळला आहे. ही महिला फिरस्ती वेडसर असून तिचे वय ५० असावे. अंगाने सडपातळ, सावळा रंग, डावे हातात स्टील कडा, अंगात काळा गाऊन परिधान केला आहे.

खालापूर येथे अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या महिलेसंबंधी माहिती मिळाल्यास खालापूर पोलीस ठाणे (०२१९२-२७५०३३) व (९०११०३१५२३) या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## श्री धावीर मंदिरात दीपोत्सव उत्साहात

### ग्रामदेवतेच्या वेबसाइटचे अनावरण

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा शहराचे शहराचे ग्रामदैवत असणाऱ्या धावीर मंदिरात त्रिपुरारी पौर्णिमेच्या निमित्ताने दीपोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. सोमवारी (दि. ७) सायंकाळी सात वाजता सर्वप्रथम ग्रामदेवतेची आरती झाली. यानंतर मंदिरासमोरील दीपमाळेवर दिवा प्रज्वलित करण्यात आला.



या वेळी मंदिर विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष ॲड. प्रशांत देशमुख, मकरंद बारटक्के, लालताप्रसाद कुशवाहा, विजयराव मोरे, नितीन परब, समीर सकपाळ, समिर शेडगे, प्रकाश पवार, हरिश्चंद्र खराडे, शैलेश कोळी, मनोहर धाटावकर, मयुर पायगुडे, निलेश चाळके, जितेंद्र दिवेकर, ॐकार गुरव आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते. या वेळी संपूर्ण मंदिर परिसर हजारो दिव्यांच्या प्रकाशात उजळून गेला होता.

रोहा शहराचे ग्रामदैवत असणाऱ्या धावीर महाराजांना पालखी सोहळ्याच्या वेळी पोलीस मानवंदना देण्यात येते. रोहेकरांच्या प्रमाणेच धावीर महाराजांवर श्रद्धा असणारे, कुलदैवत असणारे भक्तगण सर्वदूर आहेत. त्यांना आपल्या देवाशी सदैव जोडून रहावे, यासाठी मंदिर विश्वस्त मंडळाने वेबसाइटची निर्मिती केली आहे. या वेबसाइटचे अनावरण त्रिपुरारी पोर्णिमेचे औचित्य साधून करण्यात आले.

## माणगाव येथे तलाठी कार्यालयात चोरी

### अज्ञात चोरटा ४५ हजारांचा ऐवज घेऊन पसार

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तलाठी कार्यालयातील ४५ हजारांचा ऐवज घेऊन पसार झाला. ही घटना ५ ते ७ नोव्हेंबरदरम्यान घडली. याबाबत पळसगाव बुद्रुकचे कोतवाल मनोहर कांबळे (रा. पळसगाव खुर्द) यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली.

याबाबत माणगाव पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, माणगाव तलाठी भवन येथे अज्ञात चोरट्याने बंद कार्यालयाच्या दरवाजाचा कडीकोयंडा कोणत्यातरी हत्याराने तोडून कार्यालयात प्रवेश करून कार्यालयातील १५ हजार रुपये किंमतीचा तलाठी प्रियांका मॅडम यांचा लॅपटॉप, ३० हजार रुपये किंमतीचे तलाठी मोराळे यांचे दोन लॅपटॉप तसेच तलाठी प्रियांका मॅडम यांच्या बॅगमधील कागदपत्रे असा एकूण ४५ हजार रुपयांचा ऐवज घेऊन अज्ञात चोरटा पसार झाला आहे. आता शासकीय कार्यालयातच चोरी झाल्याने परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

या घटनेची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सतीश अस्वर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक गायकवाड हे करीत आहेत.

## कमळ पतसंस्थेतर्फे रक्तदान शिबिर

**अलिबाग : प्रतिनिधी**

कमळ नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष गिरीश तुळपुळे यांच्या वाढदिवसानिमित्त शुक्रवारी (दि. ११) संस्थेतर्फे संस्थेच्या अलिबाग येथील मुख्यालयात रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

कमळ पतसंस्थेतर्फे दरवर्षी ११ नोव्हेंबर रोजी संस्थेच्या सर्व शाखांमध्ये ग्राहक मेळावा व ग्राहक भेटीचा कार्यक्रम आयोजित केला जातो. या वर्षी ११ निव्हेंबर रोजी ग्राहकदिन तसेच स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्त संस्थेतर्फे संस्थेच्या मुख्य कार्यालयात रक्तदान शिबिर आयोजित करण्याचा निर्णय व्यवस्थापनाने घेतला आहे. अलिबाग व परिसरातील इच्छुक रक्तदात्यांनी ११ निव्हेंबर रोजी कमळ भवन, शिवाजी चौक येथे येऊन रक्तदान करावे, असे आवाहन अध्यक्ष सतीश पाटील यांनी केले आहे.

## श्री वरदायिनी विद्यालयात खगोलतज्ज्ञ दा. कृ. सोमण यांनी साधला मुक्त संवाद



**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर तालुक्यातील श्री वरदायिनी माध्यमिक विद्यालय कापडे बुद्रुकच्या विद्यार्थ्यांसोबत रविवारी (दि. ६) रात्री मुक्तसंवाद साधण्यासाठी खगोलतज्ज्ञ दा. कृ. सोमण हे सपत्नीक उपस्थित होते.

या वेळी त्यांनी महाड, पोलादपूर, मंडणगड या भागात दिवाळीदरम्यान आकाशात स्वयंप्रकाशित असलेली दहा ताऱ्यांची रांग ही स्कायट्रेन नसून अमेरिकेच्या स्पेसएक्स नावाच्या कंपनीने ४० देशांमध्ये वायफाय देण्यासाठी आकाशात सोडलेला स्टारलिंक उपग्रह होता. जमिनीपासून सुमारे ३५० ते ५०० किमी उंचावर असलेल्या या उपग्रहाने युक्रेन या गरीब देशाला रशियाविरूद्धच्या युद्धकाळात मोफत वायफाय सुविधा देऊन दूरसंचाराची तसेच इंटरनेटद्वारे संपर्कव्यवस्था सुरळीत ठेवली, अशी माहिती दिली.

कार्यक्रमाला शाळा समितीचे सदस्य अजय सलागरे, रामदास सकपाळ, माजी उपसभापती शैलेश सलागरे, सेवानिवृत्त नायब तहसिलदार सुभाष जगदाळे, प्रभारी मुख्याध्यापिका स्मिता विजय पवार, ज्ञानेश्वर सकपाळ, डॉ. राहुल वारंगे, अजितकुमार जंगम उपस्थित होते.

या वेळी दा. कृ. सोमण यांनी विद्यार्थ्यांसोबत संवाद साधताना चंद्रावर भ्रमण, अवकाशातील दहा आश्चर्ययुक्त रहस्ये, व्यक्तिमत्व विकासासाठी आवश्यक दहा मार्गदर्शक तत्वे तसेच विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची योग्य वैज्ञानिक उत्तरे देऊन त्यांच्या कुतुहलाचे समाधान केले. या वेळी विद्यार्थ्यांमध्ये अवकाश दर्शनाची आवड निर्माण होण्यासाठी दोन दुर्बिणी कापडे येथील श्री वरदायिनी विद्यालयाच्या प्रांगणामध्ये उभारून वेगवेगळ्या ग्रह-ताऱ्यांची माहिती देण्यात आली.

## रोहा रोटरी क्लबतर्फे शैक्षणिक साहित्यवाटप



**रोहे : प्रतिनिधी**

रोटरी क्लब रोहा सेंट्रलतर्फे गणेश सरदार यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून त्यांच्या आर्थिक योगदनातून मंगळवारी (दि. ८) कोलाड विभाग शिक्षण प्रसारक मंडळ संचालित ऐनघर (कानसई) माध्यमिक शाळेमध्ये ब्लॅकबोर्ड तसेच एलईडी ट्यूबलाइट देण्यात आले.

विद्यार्थ्यांना शिक्षणाची आवड निर्माण व्हावी तसेच शैक्षणिक क्षेत्रात उज्ज्वल यश संपादन करता यावे या दृष्टिने रोटरी क्लब रोहा सेंट्रलतर्फे प्रयत्न करण्यात आला.

सुरुवातीलाच शाळेतर्फे सर्व सदस्यांचे स्वागत करण्यात आले. क्लब प्रेसिडेंट सुचित पाटील यांनी विद्यार्थ्यांना भविष्यात अभ्यास करून खूप मोठे व्हा आणि गरजूंना अशी मदत करा, असे आवाहन केले. मुख्याध्यापक वाघ यांनी क्लबचे आभार मानले. कार्यक्रमाला रोटरी सेक्रेटरी देवेंद्र चांदगावकर, गणेश सरदार, अजित तेलंगे, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

## वृद्धाश्रमाला पुनर्जीवित करण्याचा तरुणांचा संकल्प

**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील राजेवाडी येथे गेली अनेक वर्ष बंद असलेल्या वृद्धाश्रमाला तालुक्यातील तरुणांमुळे उर्जितावस्था प्राप्त होणार आहे. मुंबईमध्ये सामाजिक कार्य करणाऱ्या स्वराज्य फाउंडेशनच्या माध्यमातून हा वृद्धाश्रम पुन्हा सुरू करण्यात येत आहे. या वृद्धाश्रमाचे सोमवारी (दि. ७) आमदार भरत गोगावले यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन करण्यात आले.



राजेवाडी याठिकाणी तत्कालीन मंत्री दिवंगत प्रभाकर मोरे यांनी वृद्धाश्रम सुरू केला होता, मात्र काळाच्या ओघात हा वृद्धाश्रम बंद पडला होता. स्वराज्य फाउंडेशन मुंबईच्या तरुणांनी हा वृद्धाश्रम अमित मोरे यांच्याकडून ताब्यात घेतला आणि साफसफाई करीत या वृद्धाश्रमाचे परिवर्तन स्वराज्य निवाऱ्यात केले.

या वेळी वृद्धाश्रम सुरू करण्यापूर्वी प्राथमिक कामांवर भर देत सामाजिक संस्था आणि दानशूर व्यक्तींकडून आर्थिक मदत घेत येथील लोकांची सेवा व्हावी अशी आशा उपस्थित सदस्यांनी व्यक्त केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाचे कुलसचिव विकास गायकवाड, महाडमधील दानशूर व्यक्ती लादुलाल जैन, सरपंच सचिन ओझर्डे, कैलास जंगम, अमित मोरे आदी या वेळी उपस्थित होते. वद्धाश्रम चालवताना लागणारी सर्वोतोपरी मदत करण्याचे आश्वासन या वेळी त्यांनी दिले. स्वराज्य फाउंडेशनच्या माध्यमातून अनिकेत तांबे यांनी वृद्धाश्रम पुन्हा सुरू करण्यासाठी पुढाकार घेतला आहे.

## नागोठण्यात रेल्वे कर्मचाऱ्याने परत केली प्रवासी महिलेची बॅग

**नागोठणे : प्रतिनिधी**

नागोठणे रेल्वेस्थानकातील रेल्वे बुकिंग क्लार्क संतोष मढवी यांनी एका प्रवासी महिलेची सापडलेली बॅग प्रामाणिकपणा दाखवून परत केली.



याबाबत सविस्तर माहिती अशी की, रविवारी (दि. ६) रत्नागिरी-दिवा पॅसेंजर गाडीने प्रवास करणाऱ्या दिपाली पवार या गोरेगाव येथून मुंबईच्या दिशेने प्रवास करीत होत्या. साधारण ११.३० वाजण्याच्या सुमारास नागोठणे-मुरावाडीदरम्यान गाडीमध्ये गर्दी असल्याने अचानकपणे पवार यांची बॅग नागोठणेजवळील निडी-मूरावाडीदरम्यान खाली पडली. गाडीमधून बॅग खाली पडताच पवार यांनी आरडाओरडा केला. त्यांच्यासमवेत असलेल्या सहप्रवाशांनी नागोठणे येथील स्टेशन तिकीट बुकिंग सेवक संतोष मढवी यांना संपर्क साधून याबाबत माहिती दिली. त्यांनी तातडीने नागोठणे ते निडी असा पायी प्रवास करीत बॅग शोधून काढली.

बॅगमध्ये प्रवासी दिपाली पवार यांचे कागदपत्र, पैसे, दागिने आदी साहित्य होते. या साहित्यसह नागोठणे रेल्वेस्थानकात स्टेशन प्रबंधक एल. एन. ठाकूर यांच्या उपस्थितीत दिपाली पवार यांना बॅग सुपूर्द करण्यात आली.

# आज न्यूझीलंड-पाकिस्तान पहिली सेमीफायनल




**सिडनी : वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषक स्पर्धेत उपांत्य फेरीमधील पहिल्या सामन्यात पहिल्या गटातील अव्वल स्थानी असलेला न्यूझीलंडचा संघ दुसऱ्या गटामध्ये दुसऱ्या स्थानी असलेल्या पाकिस्तानविरुद्ध मैदानात उतरणार आहे. सिडनीच्या मैदानावर बुधवारी (दि. ९) हा सामना होणार आहे. भारतीय वेळेनुसार दुपारी दीड वाजता हा सामना खेळवला जाईल.

उपांत्य फेरीच्या सामन्याच्या दिवशी किंवा अंतिम सामन्याच्या दिवशी पाऊस झाल्यास तो सामना अतिरिक्त राखीव दिवशी म्हणजेच पुढल्या दिवशी खेळवला जाणार आहे. सामना पावसामुळे नियोजित दिवशी रद्द झाल्यास तो दुसऱ्या दिवशी नियोजित मैदानावरच खेळवला जाईल. सामन्याच्या दिवशी पावसामुळे सामना अर्धवट सोडावा लागला, तर तो उर्वरित सामना दुसऱ्या दिवशी खेळवला जाईल. या सामन्यातील खेळ दुसऱ्या दिवशी जैसे थे स्थितीत सुरू होईल.

राखीव दिवशीही पाऊस पडला तर गुणतालिकेत अव्वल स्थानी असलेल्या संघाला विजयी घोषित करण्यात येईल. गुणतालिकेत अव्वल स्थानी असलेला संघ हा दोन्ही दिवस पावसाचा व्यत्यय आल्यास उपांत्य सामन्याचा विजयी संघ म्हणून घोषित केला जाईल.

(छाया : जितेंद्र जाधव)



### रोह्यात जिल्हास्तरीय महिला कबड्डी स्पर्धा

## किहीम संघाला विजेतेपद

**धाटाव : प्रतिनिधी**

रोह्यामध्ये जय नागोबा ग्रुपच्या वतीने सालाबादप्रमाणे जिल्हास्तरीय महिला कबड्डी स्पर्धाचे सोमवारी (दि. ७) करण्यात आले होते. या स्पर्धेत किहीम संघाने बाजी मारत चषकावर आपले नाव कोरले.

या स्पर्धेवेळी रोहा तालुका कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष विजय मोरे, आयोजक घनश्याम कराळे, जय नागोबा ग्रुपचे प्रवीण जैन, राकेश जैन, विक्रम जैन तसेच कबड्डी असोसिएशनचे जगदिश भगत, सतीश भगत, हेमंत खरिवले, प्रशांत कचरे, संदीप देसाई, रूपेश रटाटे, जयवंत घरत, अलंकार कोटेकर, लक्ष्मण गावंड, आशिष पाटील उपस्थित होते.

स्पर्धेसाठी जिल्ह्यातील विनायक दिवलांग, दिलखुश आवास, दत्तात्रेय क्रीडा मंडळ पनवेल, सानेगाव आश्रम रोहा, मिल्लेश्वर किहीम, टाकादेवी मांडवा, श्री. धावीर रोहा, दिवेआगर अशा आठ संघानी सहभाग नोंदवला होता.

श्री धावीर संघ रोहा आणि भिल्लेश्वर किहीम संघात अंतिम लढत झाली. अटीतटीच्या लढतीत किहीम संघाने बाजी मारून प्रथम क्रमांक पटकाविला. अंतिम लढत उत्कंठा वाढणारी होती. प्रेक्षकांना रोमहर्षक लढत पहायला मिळाली. पंच म्हणून अमित दळवी, सुजय फुलारे, गणपत भोईर, संदीप जाधव, विनोद पडवळ, प्रदीप जाधव यांनी काम पाहिले.

## इंग्लंडला धक्का; मलान जायबंदी

**लंडन : वृत्तसंस्था**

भारताविरुद्धच्या उपांत्य फेरीच्या सामन्यापूर्वी इंग्लंड संघासाठी एक वाईट बातमी समोर येत आहे. संघाचा स्टार फलंदाज डेव्हिड मलान दुखापतीमुळे या महत्त्वाच्या सामन्यातून बाहेर पडू शकतो. अष्टपैलू खेळाडू मोईन अलीने याला दुजोरा दिला. उभय संघांतील टी-२० विश्वचषक स्पर्धेचा दुसरा उपांत्य सामना १० नोव्हेंबर रोजी ॲडलेडमध्ये खेळवला जाणार आहे. बाद फेरीतील या डावखुऱ्या फलंदाजाच्या दुखापतीमुळे संघाच्या अडचणी वाढल्या आहेत.

डेव्हिड मलान याला नॉकआऊटच्या सामन्यात दुखापत झाली होती. मोईन अली याने त्याच्याविषयी माध्यमांना माहिती देताना म्हटले, तो मागील काही महिन्यापासून उत्तम फलंदाजी करीत आहे. त्यामुळे इंग्लंड संघाचा तो महत्त्वाचा खेळाडू राहिला आहे. मला नाही माहीत, मात्र त्याची शारीरिकदृष्ट्या तो थोडा फिट वाटत नाहीए. त्याला काल स्कॅनसाठी नेले होते. जेव्हा तो परतला तेव्हा आम्हाला त्याच्याकडे पाहून त्याची तब्येत योग्य वाटली नाही.

श्रीलंकेविरुद्धच्या सामन्यात मलानला ही दुखापत झाली होती, सुपर-१२च्या शेवटच्या सामन्यात त्याला क्षेत्ररक्षणादरम्यान दुखापत झाली होती. त्यानंतर तो मैदानावर आला नाही. १४२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना संघ अडचणीत असतानाही मलान फलंदाजीला आला नाही यावरून त्याची दुखापत किती गंभीर आहे हे समजू शकते.

### चॅम्पियन्स लीग फुटबॉल

## उपउपांत्यपूर्व फेरीत रंगणार रेयाल वि. लिव्हरपूल लढत

**नियोन : वृत्तसंस्था**

चॅम्पियन्स लीग फुटबॉलच्या उपउपांत्यपूर्व फेरीतच गतविजेता रेयाल माद्रिद आणि लिव्हरपूल हे दोन बलाढ्य संघ समोरासमोर येणार आहेत. गेल्या वर्षी याच दोन संघांत अंतिम लढत रंगली होती.

यंदा लिव्हरपूलला गेल्या वर्षीच्या अंतिम सामन्यातील पराभवाची परतफेड करण्याची संधी मिळणार आहे. यापूर्वी २०१७-१८च्या अंतिम लढतीतही माद्रिदने लिव्हरपूलला पराभूत केले होते. विशेष म्हणजे आतापर्यंत चॅम्पियन्स लीग स्पर्धेत या दोन संघात झालेल्या सहा सामन्यांतून लिव्हरपूलला एकही सामना जिंकता आलेला नाही. उपउपांत्यपूर्व फेरीतील सामने पुढील वर्षी फेब्रुवारी-मार्चमध्ये होतील.

## तीन दिग्गज आयसीसी 'हॉल ऑफ फेम'मध्ये

### कादिर, चंद्रपॉल, एडवर्ड्सचा समावेश

**दुबई : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियात सुरू असलेल्या टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्य फेरीआधी आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) तीन दिग्गज खेळाडूंचा 'हॉल ऑफ फेम'मध्ये समावेश केला आहे. वेस्ट इंडिजचा फलंदाज शिवनारायण चंद्रपॉल, पाकिस्तानचा अब्दुल कादिर आणि इंग्लंडची महिला क्रिकेटपटू चार्लोट एडवर्ड्स अशी त्यांची नावे आहेत. मतदान प्रक्रियेद्वारे त्यांची निवड करण्यात आली.

अब्दुल कादिर यांचे तीन वर्षांपूर्वी निधन झाले, पण आताही पाकिस्तानच्या फिरकी गोलंदाजीचा ज्या वेळी उल्लेख केला जातो तेव्हा कादिर यांचे नाव अग्रभागी घेतले जाते. त्यांच्या १३ वर्षांच्या प्रदीर्घ कारकिर्दीबद्दल बोलायचे




तर, त्यांनी ६७ कसोटी सामने, १०४ एकदिवसीय सामने खेळले आणि अनुक्रमे २३६ आणि १३२ बळी घेतले.

सर्वाधिक कसोटी धावा करणाऱ्या खेळाडूंच्या यादीत आठव्या क्रमांकावर असलेल्या शिवनारायण चंद्रपॉलने त्याच्या संघासाठी १६४ कसोटी आणि २६८ एकदिवसीय सामने खेळले. त्याचा बॅटिंग स्टान्स आगळावेगळा असे. त्याची कसोटीमधील सरासरी व्हीवीएन रिचर्ड्स यांच्यापेक्षा अधिक आहे.

चार्लोट एडवर्ड्सने तिच्या २० वर्षांच्या कारकिर्दीत १९९६-१६च्या काळात इंग्लंडकडून २३ कसोटी, १९१ एकदिवसीय आणि ९५ टी-२० सामने खेळले. यामध्ये तिने कसोटीमध्ये ४४.१०च्या सरासरीने १६७६ धावा, एकदिवसीय ३८.१६च्या सरासरीने ५९९२ धावा आणि टी२० मध्ये ३२.९७च्या सरासरीने २६०५ धावा केल्या आहेत. त्याचबरोबर तिने अष्टपैलू कामगिरी करत ७५ आंतरराष्ट्रीय विकेट्सही घेतल्या आहेत. तिच्या नेतृत्वाखाली २००९मध्ये इंग्लंडने विश्वचषक जिंकला होता.

## कठोर मेहनत आणि संतुलित आहार

### सूर्यकुमार यादवचा फिटनेस फंडा


**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय संघाचा धडाकेबाज फलंदाज सूर्यकुमार यादव हा सध्या जबरदस्त फॉर्ममध्ये आहे. जेव्हा तो मैदानात फलंदाजी करत असतो तेव्हा त्याला रोखणे कठीण असते. सूर्याच्या या यशामागे त्याची कठोर मेहनत आणि समर्पण आहे तसेच त्याच्या यशामध्ये त्याच्या आहाराचाही मोठा वाटा आहे.

यंदाच्या टी-२० विश्वचषकातील पाच सामन्यांमध्ये एकूण २२५ धावा करून सर्वाधिक धावा करणाऱ्या खेळाडूंच्या यादीमध्ये सूर्यकुमार पहिल्या तीन फलंदाजांमध्ये आहे. फिटनेस राखण्यासाठी तो 'चीट मील'पासून दूर राहतो.

सूर्याच्या आहाराची काळजी घेणारी प्रसिद्ध आहारतज्ज्ञ स्पोर्ट्स न्यूट्रिशनिस्ट श्वेता भाटिया यांनी तो इतका फिट असण्याचे रहस्य सांगितले आहे. त्याचबरोबर तो कोणता आहार चार्ट फॉलो करतो आणि त्याने त्याच्या शरीरावर आणि फिटनेसवर कसे काम केले आहे याबद्दलही त्यांनी माहिती दिली. श्वेता म्हणाल्या की, त्या सूर्यकुमारबरोबर गेले वर्षभर काम करीत आहेत. त्याला त्याचा एकूण फिटनेस सुधारायचा होता. त्यामुळे श्वेता यांनी त्याची क्रीडा पोषणाची समझ सुधारण्यास मदत केली.

श्वेता म्हणतात, नवीनतम संशोधनातून असे समोर आले आहे की कमी कर्बोदकांचे सेवन केल्याने खेळाडू आपले खेळातील सातत्य राखू शकतो तसेच तो आपल्या प्रदर्शनामध्ये वाढही करू शकतो. आम्ही सूर्यकुमारच्या आहारातून बहुतेक कार्बोहायड्रेट्स काढून टाकले आणि त्यामध्ये बदाम आणि ओमेगा ३सारख्या निरोगी फॅट्सचा समावेश केला. तो अंडी, मांस, मासे, दुग्धजन्य पदार्थ आणि भाज्यांमधून चांगल्या प्रमाणात प्रथिने आणि कार्बोहायड्रेट्स मिळवतो.



## प्रशिक्षक द्रविडकडून सूर्यकुमारचे कौतुक

**मेलबर्न : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाचा मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविडने सध्या भन्नाट कामगिरीने टीम इंडियाचा नवा आधारस्तंभ बनलेल्या सूर्यकुमार यादवचे कौतुक केले आहे. आक्रमक शैलीत फलंदाजी करताना कामगिरीत सातत्य टिकवून ठेवणे अत्यंत अवघड असते, मात्र सूर्यकुमार यादवने हे समीकरण साधले आहे. त्याची फलंदाजी पाहण्याचा आनंद वेगळाच असतो, असे द्रविडने म्हटले.

सूर्यकुमारने ऑस्ट्रेलियात सुरू असलेल्या ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केली आहे. त्याने आतापर्यंतच्या पाच सामन्यांत ७५च्या सरासरीने आणि १९३.९७च्या



धावगतीने २२५ धावा फटकावल्या आहेत तसेच सूर्यकुमारने वैविध्यपूर्ण आणि कलात्मक फटक्यांच्या आतषबाजीने क्रिकेटरसिकांना, समालोचकांना आणि आपल्या संघातील सहकाऱ्यांनाही थक्क केले आहे. भारताचा प्रशिक्षक द्रविड खेळाडू म्हणून आपल्या तंत्रशुद्ध फलंदाजीसाठी ओळखला जायचा. सूर्यकुमारची फलंदाजीची शैली द्रविडपेक्षा पूर्णपणे भिन्न असली तरी तो सूर्यकुमारच्या कामगिरीने प्रभावित झाला आहे.

'सूर्यकुमार ज्या आक्रमकतेने आणि ज्या धावगतीने फलंदाजी करतो त्या कामगिरीमध्ये सातत्य टिकवणे अत्यंत अवघड असते, मात्र सूर्यकुमारला आक्रमकता आणि सातत्य यांच्यात सांगड घालणे जमले आहे. तो अप्रतिम फलंदाजी करतो आहे. फलंदाजीदरम्यान आपल्याला काय करायचे आहे, हे त्याला ठावूक आहे. त्याचे योगदान आमच्यासाठी खूप महत्त्वाचे ठरते आहे. त्याची फलंदाजी पाहताना वेगळीच मजा येते,' असे द्रविड म्हणाला.

सूर्यकुमारच्या २५ चेंडूंतील नाबाद ६१ धावांच्या खेळीमुळे भारताने अव्वल १२ फेरीतील अखेरच्या सामन्यात झिम्बाब्वेचा पराभव केला होता. या खेळीदरम्यान सूर्यकुमारने पुन्हा एकदा सर्वांना थक्क करणारे फटके मारले. 'सूर्यकुमारने मारलेल्या फटक्यांचे शब्दांत वर्णन करणे अवघड आहे. तो सध्या जगातील सर्वोत्तम ट्वेन्टी-२० फलंदाज का आहे हे त्याने पुन्हा एकदा दाखवून दिले,' अशी प्रतिक्रिया द्रविडने व्यक्त केली.

## सानियाच्या नव्या पोस्टमुळे घटस्फोटावर शिक्कामोर्तब?



**कराची : वृत्तसंस्था**

गेल्या काही दिवसांपासून भारताची टेनिस स्टार सानिया मिर्झा आणि पाकिस्तानी क्रिकेटपटू शोएब मलिक यांच्यामध्ये काही तरी बिनसले असल्याच्या चर्चा रंगू लागल्या आहेत. २०१० साली या दोघांनी लग्न केले असून त्यांना इझान नावाचा एक मुलगा आहे, मात्र असे म्हटले जात आहे की या जोडप्यामधील अंतर वाढत असून ते दोघे लवकरच विभक्त होणार आहेत.

सानिया आणि शोएबच्या लग्नाला आता १२ वर्ष पूर्ण झाली आहेत. एप्रिल २०१०मध्ये अतिशय वादग्रस्त प्रसंगामध्ये त्यांचे लग्न झाले होते. इतक्या वर्षांमध्ये पहिल्यांदाच या दोघांमध्ये काहीही ठीक नसल्याच्या चर्चांना उधाण आले आहे.

काही दिवसांपूर्वी शोएब आणि सानिया यांनी एकत्रितपणे त्यांच्या मुलाचा वाढदिवस साजरा केला. शोएबने या संबंधीचे फोटो आपल्या सोशल मीडिया अकाउंटवर शेअर केले होते, पण सानियाने यासंबंधी कोणतीही पोस्ट केली नाही, मात्र सानियाने नुकत्याच केलेल्या पोस्टमुळे लोकांच्या भुवया उंचावल्या आहेत. यामध्ये तिने लिहिले, तुटलेली हृदये कुठे जातात? अल्लाला शोधण्यासाठी. त्यामुळे सानिया आणि शोएब यांच्यात आलबेल नसल्याचे चित्र आहे.

## आंतरराष्ट्रीय किकबॉक्सिंग स्पर्धेत रायगडातील खेळाडू चमकले

**उरण : बातमीदार**

दिल्ली येथे नुकतीच दुसरी ओपन इंडियन आंतरराष्ट्रीय किकबॉक्सिंग स्पर्धा झाली. या स्पर्धेत रायगड जिल्ह्याच्या पनवेल, पेण व माणगाव तालुक्यातील चार खेळाडूंनी सहभाग घेत पदके जिंकली

स्पर्धेचे उद्घाटन अभिनेत्री रितिका सिंग, टेक्निकल कमिटी वाको चेअरमन रोमिओ देसा (क्रॉटिया), रेफ्री कमिटी रिंग स्पोर्ट्स वाको चेअरमन युरी लक्टिकोव (इस्टोनिया) यांच्या हस्ते करण्यात आले. स्पर्धेत तीन देशांतील ८००पेक्षा अधिक खेळाडूंनी सहभाग घेतला होता.




स्पर्धेत रायगडातील सौम्या पिंपळेने दोन सुवर्ण, ऋग्वेद जेधेने सुवर्ण व कांस्य, अस्मि गुरवने सुवर्ण आणि केदार खांबेने कास्यंपदक जिंकले. महाराष्ट्र राज्याच्या टीमला अध्यक्ष निलेश शेलार यांचे मार्गदर्शन लाभले. भारताचे कोच जयेश चोगले तसेच अम्याचुअर किकबॉक्सिंग स्पोर्ट्स असोसिएशन पनवेल यांनीही मार्गदर्शन केले. यशस्वी खेळाडूंचे अभिनंदन होत आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com